महाराष्ट्र जनशक्ती
ई-पेपर (पीडीएफ) आवृत्ती व्हॉट्सअप आणि सोशल मीडियावर शेअर करण्यास परवानगी आहे!

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे. बातम्या व जाहिराती ७५८८००५००२ या नंबरवर व्हाट्सअॅप करा.

महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या न्याय्य व हक्कासाठी लढणारी शक्ती

# महाराष्ट्र जनशक्ती

मुख्य संपादक : प्राचार्य डॉ. हसन इनामदार




छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) वर्ष : तिसरे अंक : २७२ वे दिनांक : २८/०९/२०२६ वार : सोमवार

## निवडणूक निकालानंतर आयोगावर टीका का?: नितेश राणेंचा ठाकरे बंधूंवर निशाणा



**सिंधुदुर्ग** : निवडणूक आयोगाच्या विरोधात 4 ऑक्टोबरला उद्धव ठाकरे मोर्चा काढणार असल्याच्या पार्श्वभूमीवर मंत्री नितेश राणे यांनी ठाकरे बंधूंवर जोरदार टीका केली. लोकसभा निवडणुकीनंतर उद्धव ठाकरे यांच्या पक्षाचे खासदार निवडून आले, त्यावेळी निवडणूक आयोगाविरोधात मोर्चा का काढला नाही, असा सवाल नितेश राणे यांनी उपस्थित केला. निवडणूक जिंकल्यानंतर आयोगाबाबत काही न बोलता निवडणूक हरल्यानंतरच आयोगावर प्रश्न उपस्थित केले जात असल्याचा आरोप त्यांनी केला. केरळमध्ये काँग्रेस विजयी झाली किंवा कर्नाटकमध्ये काँग्रेस सत्तेत आली, त्या वेळी निवडणूक आयोगाबाबत विरोधकांनी प्रश्न उपस्थित केले होते का, असा सवालही राणे यांनी केला. ‘जेव्हा जेव्हा हे लोक इलेक्शन जिंकतात, तेव्हा इलेक्शन कमिशनबद्दल काही बोलत नाहीत,’ असे ते म्हणाले. निवडणूक आयोग ही देशातील महत्त्वाची संस्था असल्याचे सांगत या संस्थेबाबत आरोप-प्रत्यारोप करून देशाच्या लोकशाहीविषयी प्रश्न निर्माण होऊ नयेत, असे आवाहनही त्यांनी केले. निवडणूक आयोगाच्या मुद्द्यावरून संजय राऊत आणि राहुल गांधी यांच्यावरही त्यांनी टीका केली. उद्धव ठाकरे 4 ऑक्टोबरला निवडणूक आयोगाच्या विरोधात मोर्चा काढणार असल्याबाबत विचारले असता, ‘लोकसभेच्या नंतर उद्धव ठाकरेंनी निवडणूक आयोगावर मोर्चा काढण्याची हिंमत दाखवली का? कारण स्वतःचे खासदार निवडून आले होते,’ असा सवाल राणे यांनी केला. दरम्यान, सिंधुदुर्ग जिल्ह्यातील दुष्काळाच्या परिस्थितीवरही नितेश राणे यांनी माहिती दिली. ‘ट्रिगर-1’मध्ये जिल्ह्यातील 8 ही तालुक्यांचा समावेश झाल्यानंतर लोकप्रतिनिधी आणि प्रशासनाने एकत्रित बैठक घेऊन पुढील नियोजन केले आहे. दुष्काळामुळे निर्माण होणाऱ्या परिस्थितीचा सामना कसा करायचा, त्यावर कोणत्या उपाययोजना करायच्या आणि शासनाकडून मदत जाहीर झाल्यानंतर कोणताही नागरिक मदतीपासून वंचित राहू नये, यावर बैठकीत चर्चा झाल्याचे त्यांनी सांगितले. या बैठकीला आमदार निलेश राणे, दीपक केसरकर, जिल्हा परिषद आणि पंचायत समितीचे अध्यक्ष, उपाध्यक्ष व सदस्य, जिल्हाधिकारी, जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी तसेच प्रशासकीय अधिकारी उपस्थित होते. ‘सिंधुदुर्ग म्हणून सगळ्यांनी एकत्र बसून येणाऱ्या संकटाचा सामना करण्याचे नियोजन केले आहे,’ असे नितेश राणे म्हणाले. तळांबा धरणाच्या कामाला गती देण्याबाबत विचारले असता, नितेश राणे यांनी हा विषय जनतेच्या कोर्टात असल्याचे सांगितले. धरणाचे जवळपास 24 टक्के काम पूर्ण झाले आहे. यापूर्वी या प्रकल्पाला विरोध आणि आंदोलन झाले असल्याने संबंधित नागरिकांशी पुन्हा चर्चा करून निर्णय घेतला जाईल, असे त्यांनी स्पष्ट केले. ‘ज्या गोष्टी जनतेला मान्य नसतील त्या मायनस करू, ज्या हव्या असतील त्या करू. जनतेला हा विषय हवा असेल तर हा विषय पुढे नेऊ,’ अशी भूमिका त्यांनी मांडली.

## समृद्धी महामार्गावर 'महाराष्ट्र शासन'चा बोर्ड लावून लूटमार

**नाशिक** : समृद्धी महामार्गावर एक अत्यंत धक्कादायक घटना उघडकीस आली असून, भामट्यांनी चक्क कांद्याने भरलेला एक ट्रक लुटला आहे. 'महाराष्ट्र शासन' असा फलक आणि सायरन लावलेल्या एका आलिशान स्कोडा कारमधून आलेल्या चार चोरट्यांनी हा ट्रक पळवून नेला. मात्र, बुलढाणा पोलिसांनी तत्परतेने कारवाई करत अवघ्या काही तासांतच या भामट्यांच्या मुसक्या आवळल्या आहेत. नाशिकहून कांदा घेऊन झारखंडकडे जाणाऱ्या या ट्रकच्या चालकाला डोणगाव पोलिस ठाण्याच्या हद्दीत अडवण्यात आले. मध्यरात्रीच्या सुमारास आलेल्या या चार आरोपींनी चालकाला बेदम मारहाण केली आणि त्याला महामार्गावरच सोडून ट्रकसह पोबारा केला. त्यानंतर जखमी चालकाने तात्काळ 112 या आपत्कालीन क्रमांकावर संपर्क साधला. पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत जखमी चालकाला उपचारासाठी मेहकर येथील शासकीय रुग्णालयात दाखल केले असून त्याच्यावर उपचार सुरू आहेत. चालकाच्या तक्रारीनंतर बुलढाणा पोलिसांनी तातडीने समृद्धी महामार्ग पोलिसांच्या कंट्रोल रूमला या घटनेची माहिती दिली. पोलिसांनी वेगाने सूत्रे हलवत वाशिम जिल्ह्यात सदर कांद्याचा ट्रक आणि स्कोडा कारसह चारही भामट्यांना बेड्या ठोकल्या. मिळालेल्या माहितीनुसार, या चार आरोपींपैकी तीन जण नाशिक जिल्ह्यातील असून एक जण बांगलादेशी आहे. अटकेनंतर या सर्वांना मेहकर न्यायालयात हजर करण्यात आले. या घटनेमुळे समृद्धी महामार्गावरील प्रवासी आणि वाहनांच्या सुरक्षेचा मुद्दा पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे. विशेष म्हणजे, गुन्हेगारांनी आपल्या आलिशान कारवर 'महाराष्ट्र शासन' असा फलक आणि सायरन लावला होता, ज्यामुळे त्यांना तपासणीसाठी कुठेही रोखण्यात आले नाही. महामार्गावर अलीकडच्या काळात वाहने अडवून लूटमार करण्याच्या घटना वाढल्याने सध्या वाहनचालकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. भामट्यांनी इतर मौल्यवान वस्तू सोडून चक्क कांद्याचा ट्रक का चोरला, यामागे बाजारातील कांद्याचे वाढलेले दर हे मुख्य कारण असल्याचे मानले जात आहे. सध्या बाजारपेठेत कांद्याला पाच ते सहा हजार रुपयांचा चांगला भाव मिळत आहे. कांद्याच्या याच वाढलेल्या किमतींमुळे पैशांच्या लालसेपोटी भामट्यांनी कांद्याचा ट्रक लुटल्याची दाट शक्यता वर्तवली जात आहे.

## वीजगळतीविरोधात महावितरणची धडक कारवाई: ३ दिवसांत ८० जणांवर कारवाई

**छत्रपती संभाजीनगर** : शहरातील वीजगळतीचे प्रमाण सध्या 43 टक्क्यांवर गेल्याने महावितरणने अत्यंत आक्रमक भूमिका घेतली आहे. वीजचोरीला आळा घालण्यासाठी शहरासह विविध भागांत धडक मोहीम राबवण्यात आली असून, गेल्या तीन दिवसांत 80 वीजचोरांवर पोलिसांत गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. छत्रपती संभाजीनगरात पहिल्यांदाच इतक्या मोठ्या प्रमाणावर कारवाई झाली आल्याची माहिती असून यामुळे वीजचोरांचे धाबे दणाणले आहे. चिकलठाणा उपविभागातील विमानतळ शाखेचे सहायक अभियंता प्रदीप मिसाळ व त्यांच्या पथकाने हिनानगर, सावित्रीनगर, चिकलठाणा, मोतीवाला कॉलनी, मूर्तिजापूर, म्हाडा कॉलनी, भारतनगर आणि मुकुंदनगर भागात तपासणी केली. यात खंडित केलेल्या स्मार्ट मीटरमध्ये फेरफार करून परस्पर वीज जोडल्याचे उघडकीस आले. या कारवाईत 5,041 युनिट्सची (98,780 रुपये) वीजचोरी पकडण्यात आली. याप्रकरणी सिडको पोलिस ठाण्यात तहेशीम खान मुसरत खान, सख्वाद्दीन शाम्सोद्दिन तांबोळी, सय्यद मोसिन सय्यद यासीन, मोहम्मद इसुफ मोहम्मद सईद, शहाजानबी दगदुबाई शेख, अरबाझ शेख शेरू, उज्ज्वला दगडू साबळे, पी. इम्रान इमान अयनूर शेख, इस्माईल ए. रहमान शेख, आशालता बाबुराव रानडे, राजू उत्तमराव चव्हाण आणि बकाल सांडू साळुबा या ग्राहकांवर गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. महावितरणचे व्यवस्थापकीय संचालक लोकेश चंद्र यांनी तांत्रिक व वाणिज्यिक हानी राज्यभरात 10 टक्क्यांपेक्षा कमी करण्याचे उद्दिष्ट अधिकाऱ्यांना दिले आहे. त्यानुसार थकीत वीज बिल वसुलीला प्राधान्य देत वीजचोरीविरुद्ध ही कडक मोहीम हाती घेण्यात आली. छत्रपती संभाजीनगर ग्रामीण शाखेचे (वाळूज महानगर) सहायक अभियंता शेख फेरोज व त्यांच्या पथकाने राबवलेल्या मोहिमेत वडगाव कोल्हाटी येथील 32 ग्राहकांवर कारवाई करण्यात आली.

## ज्यांच्या हाताने सोडले उपोषण, तिचेच जरांगेंवर सनसनाटी आरोप!



**जालना** : मराठा आरक्षणासाठी लढा देणारे मनोज जरांगे पाटील यांच्यावर त्यांच्याच आंदोलनात सक्रिय असलेल्या ललिता तारख या महिलेने गंभीर आरोप केले आहेत. त्यांच्याच सहकारी राहिलेल्या महिलेने जरांगे पाटील यांच्यावर जोरदार टीका केल्यामुळे मोठी खळबळ उडाली असून, या आरोपांनी सर्वांचे लक्ष वेधून घेतले आहे. मनोज जरांगे यांच्यावर आरोप करताना ललिता तारख म्हणाल्या, मनोज जरांगे यांनी आमच्या गावाला खोटे आश्वासन देऊन माता माऊल्यांना फसवले. तुमच्या उपोषणाची मी साक्षीदार आहे, तुम्ही कसे उपोषण केले हे मी वेळ आल्यावर सांगेल. जरांगे यांनी भावनिक करून महिलांचा वापर केला. मनोज जरांगे यांचे चौथे उपोषण मी सोडले. रात्रंदिवस आम्ही आंदोलनासाठी झटत होतो. अंतरवाली सराटीमध्ये एक देखील कुणबी सर्टिफिकेट मिळाले नाही, हैदराबाद गॅझेटमधून आम्ही दहा महिन्यांपूर्वी अर्ज केला आहे. जरांगे यांनी आमच्या गावाला खोटे आश्वासन देऊन फसवले, असा आरोप त्यांनी केला आहे. पुढे बोलताना ललिता तारख म्हणाल्या, अंतरवाली सराटीमध्ये एकही कुणबी नोंद सापडलेली नाहीये, मनोज जरांगे यांनी हैदराबाद गॅझेटीयरनुसार आरक्षण भेटेल असे आश्वासन आम्हाला दिले होते. यापूर्वी आम्ही मंडप काढू नये म्हणून पोलिसांना विरोध केला होता.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), सोमवार २८ सप्टेंबर २०२६


## व्यापारी नागरिक सहकारी पतसंस्थेच्या 31व्या सर्वसाधारण सभेनिमित्त पशुपालन व्यवस्थापन व्याख्यान व शिबिर




**मुरूम (प्रा. सुधीर पंचगल्ले) :** शेतीला जोडधंद्याची साथ देत पशुपालन व दुग्ध व्यवसायाकडे तरुणांनी स्वयंरोजगाराची मोठी संधी म्हणून पाहण्याची गरज आहे. कोविड काळात शहरातून गावाकडे परतलेल्या अनेक तरुणांनी पुन्हा शहराची वाट न धरता पशुपालन व दुग्ध व्यवसाय सुरू केला. आज याच व्यवसायातून अनेकांना नोकरीपेक्षाही चांगले उत्पन्न मिळत आहे. खेड्यांचे चित्र बदलायचे असेल तर शेतीसोबत शेतीपूरक व्यवसाय उभे करणे आवश्यक असून, त्यासाठी जिद्द, चिकाटी आणि मेहनत महत्त्वाची आहे, असे प्रतिपादन महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठाचे नागपूर विस्तार शिक्षण विभागाचे माजी संचालक प्रा. डॉ. अनिल भिकाने यांनी केले. व्यापारी नागरिक सहकारी पतसंस्था मर्यादित, मुरूमच्या ३१व्या सर्वसाधारण सभेनिमित्त पशुपालन व्यवस्थापन व्याख्यान व शिबिराचे आयोजन रविवारी (ता. २७) रत्नमाला मंगल कार्यालयात करण्यात आले होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महादेवप्पा बडूरे होते. प्रमुख वक्ते म्हणून प्रा. डॉ. अनिल भिकाने यांच्यासह कार्यक्रमास पतसंस्थेचे चेअरमन उमेश कारभारी, उपाध्यक्ष अशोक चव्हाण, सचिव श्रीकांत मिनियार, संचालक दत्तात्रय गिरीबा, अंबाजी बिराजदार, सुरेश रणसुरे, प्रवीण सोलापुरे तसेच उमरगा येथील व्यापारी सुभाष गिरीबा यांची प्रमुख मान्यवर म्हणुन उपस्थिती होती.यावेळी पतसंस्थेचे सचिव श्रीकांत मिनियार यांनी प्रास्ताविकासोबत संस्थेचा अहवाल वाचताना पतसंस्थेच्या आर्थिक प्रगतीची आकडेवारी सादर केली. ३१ मार्च २०२६ अखेर पतसंस्थेच्या ठेवी ८ कोटी ८४ लाख रुपये, गुंतवणूक ४ कोटी ५१ लाख रुपये, तर एकूण कर्जवाटप ७ कोटी ९९ लाख रुपये आहे. त्यापैकी सुरक्षित कर्जाचे प्रमाण ७ कोटी ४७ लाख रुपये असून, संस्थेची कर्जवसुली ८०.२८ टक्के आहे. पतसंस्थेला ऑडिट वर्ग 'ब' दर्जा प्राप्त असून सभासदांना १२ टक्के लाभांश वाटप करण्यात येत असल्याची माहिती मिनियार यांनी दिली. तत्पूर्वी कार्यक्रमाची सुरुवात मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलनाने झाली. यावेळी कार्यक्रमाध्यक्ष महादेवप्पा बडूरे व प्रमुख वक्ते प्रा. डॉ. अनिल भिकाने यांचा सत्कार करण्यात आला. मात्र, राज्यातील दुष्काळी परिस्थितीमुळे शेतकऱ्यांवर निर्माण झालेल्या संकटाच्या पार्श्वभूमीवर इतर मान्यवरांनी सत्कार स्वीकारला नाही.पुढे बोलताना प्रा. डॉ. भिकाने म्हणाले की, 'पशुपालक ते पशु उद्योजक' हा मार्ग अत्यंत सोपा असून, सकाळी दोन तास आणि संध्याकाळी दोन तास नियोजनबद्ध वेळ दिल्यास पशुपालन व्यवसाय चांगल्या पद्धतीने करता येतो. पशूंना योग्य व्यवस्थापन, आहार आणि विश्रांती मिळणे अत्यंत महत्त्वाचे आहे. पशूंना कमीत कमी १२ ते १३ तास रवंथ करण्यासाठी वेळ मिळाला पाहिजे, तसेच सुमारे १४ ते १५ तास बसण्याची विश्रांती मिळणे आवश्यक आहे. पशू जितका अधिक रवंथ करेल, तितके त्याचे आरोग्य चांगले राहून दूध उत्पादनास मदत होते, असे त्यांनी सांगितले. शेतीशी निगडित व्यवसाय करणाऱ्या अनेक तरुणांनी मेहनतीच्या जोरावर स्वतःचे आर्थिक विश्व निर्माण केले आहे. पशुपालन व दुग्ध व्यवसायासाठी आर्थिक अडचण भासल्यास व्यापारी नागरिक सहकारी पतसंस्था तसेच इतर बँका व पतसंस्थांच्या माध्यमातून कर्जसुविधेचा लाभ घेता येतो, असेही डॉ. भिकाने यांनी सांगितले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सुदर्शन अंबुरे यांनी केले, तर आभार सिद्रामप्पा तुगावे यांनी मानले. व्याख्यान व शिबिरास व्यापारी बांधवांसह शहरातील विविध वयोगटांतील शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमानंतर उपस्थितांसाठी भोजनाची व्यवस्था करण्यात आली होती.

## स्नेह मिलन मेळावा १० वी. १९८८

**मुरुम (प्रा. सुधीर पंच्चगल्ले) :** या पुनर्भेटीने पुन्हा एकदा आपण सारे जवळ आलो! प्रिय सवंगडी मित्र-मैत्रिणींनो,आपल्या सर्वांच्या उत्स्फूर्त सहभागामुळे 'पुनर्भेट २०२६' हा स्नेहसोहळा अत्यंत आनंददायी, भावपूर्ण आणि आयुष्यभर स्मरणात राहणारा ठरला.तब्बल ३८ वर्षांनंतर पुन्हा भेटताना प्रत्येकाच्या चेहऱ्यावर दिसणारा आनंद, जुन्या आठवणींना मिळालेला उजाळा, आत्मीयतेने रंगलेल्या गप्पा आणि काही क्षणी भावनाविवश झालेले सवंगडी—हे सारे अनुभव शब्दांत मांडणे खरोखरच कठीण आहे.आपल्या सर्वांचे आदरणीय गुरुजन श्री लंगडे गुरुजी, सारणे गुरुजी, एकुंडे गुरुजी, पडवळ गुरुजी आणि पाटीलबाई यांची उपस्थिती आपल्या सर्वांसाठी अत्यंत प्रेरणादायी आणि आनंददायी ठरली. आपल्या गुरुजनांचे आशीर्वाद आणि त्यांचे स्नेहपूर्ण सान्निध्य लाभल्यामुळे या पुनर्भेटीला एक वेगळेच भावनिक अधिष्ठान प्राप्त झाले.आदरणीय पाटीलबाईंशी झालेला मनमोकळा संवाद हा कार्यक्रमातील अत्यंत हृदयस्पर्शी क्षण ठरला. त्यांच्या आठवणी, शिकवण आणि विद्यार्थ्यांविषयीचा जिव्हाळा अनुभवताना अनेकांच्या भावना दाटून आल्या. काही काळासाठी आपण पुन्हा एकदा त्यांच्या वर्गातील तेच निरागस विद्यार्थी झालो होतो.आपला मित्र किसन माने याने आपल्या सर्व दिवंगत सवंगड्यांचे भावपूर्ण स्मरण करून आपल्या मनातील त्यांच्याविषयीच्या भावना व्यक्त केल्या. आनंदाच्या या सोहळ्यामध्ये काळाच्या पडद्याआड गेलेल्या आपल्या सवंगड्यांची उणीव प्रत्येकाला जाणवत होती. त्यांना वाहिलेली आदरांजली सर्वांच्या अंतःकरणाला स्पर्शून गेली.राष्ट्रपती पुरस्कार विजेते जगदाळे सर यांनी आवेशपूर्ण आणि अत्यंत उत्साहवर्धक पोवाडा सादर करून वातावरण भारून टाकले. चंद्रकांत गुंड यांच्या श्रवणीय गीतांनी कार्यक्रमात रंग भरला, तर सुरेश चव्हाण यांच्या अनपेक्षित आणि सुरेल गायनाने सर्वांनाच सुखद आश्चर्याचा धक्का दिला.करमणुकीच्या कार्यक्रमात रमलेल्या आपल्या सर्वांना पुन्हा शालेय आठवणींच्या विश्वात घेऊन जाण्याचे महत्त्वपूर्ण काम सुलक्षणाने केले. तिच्या सादरीकरणामुळे शाळेतील ते दिवस पुन्हा आपल्या डोळ्यांसमोर जिवंत झाले. अंजली, अविनाश आणि वैशाली यांनी विविध कविता सादर करून कार्यक्रमात सक्रिय आणि अर्थपूर्ण सहभाग नोंदवला. संजयने सादर केलेल्या गवळणीने तर सर्वांची मने जिंकली.आपण सर्वांनी एकत्रितपणे गायलेल्या संत तुकडोजी महाराजांच्या—"राजास जी महाली, सौख्ये कधी मिळाली..."आणि"हे मायभू, तुझे मी फेडीन पांग सारे..."या गीतांच्या समूहगायनाने आपण पुन्हा एकदा आपल्या शालेय जीवनात हरवून गेलो. त्या क्षणी वय, पद, प्रतिष्ठा आणि व्यावहारिक आयुष्यातील सर्व अंतर विसरून आपण तेच जुने शाळकरी सवंगडी झालो होतो.विविध मनोरंजक खेळांच्या माध्यमातून श्री संतोष पवार यांनी प्रत्येकाला सहजपणे आणि कोणताही संकोच न वाटू देता सहभागी करून घेतले. त्यांच्या कल्पकतेमुळे कार्यक्रमात उत्साह, हास्य आणि खेळकरपणा सतत टिकून राहिला.या सर्व कार्यक्रमांना एका सुंदर सूत्रात गुंफत आपल्या उत्साही आणि सहजसुंदर सूत्रसंचालनातून प्राध्यापक लक्ष्मण बिराजदार यांनी कार्यक्रमाला विलक्षण जिवंतपणा दिला. प्रत्येक प्रसंगाला अनुरूप शब्द, विनोद, भावना आणि उत्साह यांचा त्यांनी साधलेला मेळ निश्चितच कौतुकास्पद होता.कार्यक्रमाच्या व्यवस्थेसाठी सतत धावपळ करणारे मलंग अनंतांकारी आणि इतर सर्व सहकारी यांचे योगदानही अत्यंत मोलाचे आहे. त्यांच्या नियोजनामुळे आणि परिश्रमामुळे संपूर्ण कार्यक्रम अत्यंत नेटकेपणाने आणि सुरळीतपणे पार पडला.कार्यक्रमातील प्रत्येक उपक्रमाला मिळालेला उत्स्फूर्त प्रतिसाद, प्रत्येक सवंगड्याचा मनापासून सहभाग आणि सर्वत्र जाणवणारी आत्मीयता यामुळे सुरुवातीपासून समारोपापर्यंत एक विलक्षण जिवंतपणा अनुभवायला मिळाला.समारोप झाल्यानंतरही कोणाचेच पाय तेथून निघत नव्हते... अजून थोडा वेळ एकत्र राहावे, आणखी काही आठवणी जागवाव्यात आणि आणखी थोड्या गप्पा माराव्यात, असे प्रत्येकालाच वाटत होते. हीच आपल्या पुनर्भेटीच्या यशाची खरी पावती आहे!आपल्या व्यस्त जीवनातून आवर्जून वेळ काढून उपस्थित राहिलात, प्रत्येक उपक्रमात आनंदाने सहभागी झालात आणि या पुनर्भेटीला आयुष्यभर जपून ठेवावी अशी सुंदर आठवण बनवलीत, याबद्दल आपणा सर्वांचे मनःपूर्वक आभार!या पुनर्भेटीत पुन्हा नव्याने दृढ झालेला जिव्हाळा, स्नेह आणि संवाद यापुढेही असाच कायम राहू दे.ते दिवस... ती शाळा... ते गुरुजन... ते सवंगडी...आणि आज पुन्हा नव्याने बहरलेली आपली मैत्री!




# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), सोमवार २८ सप्टेंबर २०२६


## अंडर-१९ फुटबॉलमध्ये इकरा पब्लिक स्कूलचा विजयी पराक्रम; रायसोनीवर ३-० मात, जिल्हास्तरावर निवड



**जळगाव :** जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय,जळगाव व पंचायत समिती शिक्षण विभाग,जळगाव यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित तालुकास्तरीय शालेय फुटबॉल स्पर्धेत इकरा पब्लिक स्कूलने अंडर-१९ गटात अजिंक्यपद पटकावले.गोदावरी इंजिनीअरिंग कॉलेजच्या फुटबॉल क्रीडांगणावर झालेल्या या स्पर्धेच्या अंतिम सामन्यात इकरा पब्लिक स्कूलने रायसोनी कॉलेजचा ३—० गोलने पराभव करत दिमाखदार विजय मिळवला.अंतिम सामन्यात इकरा पब्लिक स्कूलच्या खेळाडूंनी सुरुवातीपासूनच आक्रमक आणि शिस्तबद्ध खेळाचे प्रदर्शन केले.उत्कृष्ट सांघिक खेळ,अचूक पासिंग आणि प्रभावी आक्रमणाच्या जोरावर इकराने रायसोनी कॉलेजविरुद्ध तीन गोल नोंदवत विजयावर शिक्कामोर्तब केले.या विजयासह इकरा पब्लिक स्कूलने जिल्हास्तरीय फुटबॉल स्पर्धेसाठी आपले स्थान निश्चित केले आहे.आता ३ ऑक्टोबर रोजी भुसावळ येथे जिल्हास्तरीय सामने होणार असून, इकरा पब्लिक स्कूलचा संघ या स्पर्धेत जळगाव तालुक्याचे प्रतिनिधित्व करणार आहे.या यशामागे क्रीडा शिक्षक आमिर खान आणि वसीम खान यांचे मोलाचे मार्गदर्शन,योग्य नियोजन आणि खेळाडूंच्या कठोर परिश्रमांचा मोठा वाटा आहे.या ऐतिहासिक विजयाबद्दल तसेच जिल्हास्तरावर निवड झाल्याबद्दल इकरा एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष डॉ.करीम सालार, जनरल सेक्रेटरी एजाज मलिक आणि प्राचार्य शेख शकील यांनी विजयी संघातील सर्व खेळाडू,कर्णधार तसेच क्रीडा शिक्षकांचे विशेष कौतुक केले.तसेच आगामी जिल्हास्तरीय सामन्यांसाठी संघाला हार्दिक शुभेच्छा दिल्या.

# आंतरमहाविद्यालयीन स्क्वॅश रॅकेट स्पर्धेत ४५ खेळाडूंचा सहभाग



*फोटो कॅप्शन : आंतरमहाविद्यालयीन स्क्वॅश रॅकेट स्पर्धेचे उद्घाटन करताना प्रा. डॉ. एम. डी. जहागिरदार, प्राचार्य डॉ. संतोष लोमटे, डॉ. धुमाळ, डॉ. संदीप जगताप, डॉ. रोहिदास गाडेकर, डॉ. शेख अफसर, श्री. गंगाधर मोदाळे आदी दिसत आहेत.*

**छत्रपती संभाजीनगर :** राधाई महाविद्यालय आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ यांच्या संयुक्त विद्यमाने विभागीय क्रीडा संकुल, छत्रपती संभाजीनगर येथे आयोजित करण्यात आलेल्या अंतरमहाविद्यालयीन स्क्वॅश रॅकेट स्पर्धेत तब्बल 45 खेळाडूंनी सहभाग नोंदविला.स्पर्धेचे उद्घाटन विद्यापीठाचे माजी वरिष्ठ क्रीडा संचालक डॉ. एल. आर. धुमाळ यांच्या हस्ते करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ज्येष्ठ शिक्षणतज्ञ प्रा. डॉ. एम. डी. जहागीरदार होते. यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. संतोष लोमटे, राधाई महाविद्यालयाचे संचालक श्री. समृद्ध लोमटे, डॉ. संदीप जगताप, डॉ. रोहिदास गाडेकर, श्री. गंगाधर मोदाळे, डॉ. सुरेश नलावडे, डॉ. विलास तांगडे, विद्यापीठाचे समन्वयक डॉ. अभिजीतसिंह दिक्कत आणि डॉ. कैलास शिवणकर यांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. संतोष लोमटे यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. मेघा हजारी यांनी तर आभार आयोजन समितीचे सचिव प्रा. डॉ. शेख अफसर यांनी आभार मानले.स्पर्धेचे यशस्वी आयोजन करण्यासाठी महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. अब्दुल समद, डॉ. नंदकिशोर सोनावणे, सौ. मेघा हजारी, तेजस्विनी वाघमारे, सुजाता पाटील, संदीप घुगे, सोहेल पटेल, सौरभ मगरे यांनी विशेष परिश्रम घेतले. स्पर्धेचे पंच म्हणून डॉ. संदीप जगताप, डॉ. रोहिदास गाडेकर, समाधान बेलेवार, डॉ. कैलास शिवणकर, शैलेश घोडके, कल्याण गाडेकर, श्रीराम गायकवाड, वेदांत देवरे, आदित्य घोडके, रिहान बेग यांनी महत्त्वाची भूमिका बजावली.मुलींच्या गटातील निकालमुलींच्या गटात प्रथम क्रमांक- प्रभुगूल नरला (इन्स्टिट्यूट ऑफ फॉरेन्सिक सायन्स, छत्रपती संभाजीनगर). द्वितीय क्रमांक-प्रतिक्षा ठोंबाळे (ईश्वरसिंह नाईक महाविद्यालय, आडूळ)तृतीय क्रमांक- प्रणाली बनसोड (श्री संत सावता माळी ग्रामीण महाविद्यालय, फुलंब्री), चौथा - प्राजक्ता महेशमाळे (शासकीय ज्ञान-विज्ञान महाविद्यालय) पाचवा- ऋतुजा रोरे (श्री संत सावता माळी ग्रामीण महाविद्यालय, फुलंब्री) तर सहावा- आचल गल्होत (राधाई महाविद्यालय) हिने सहावा क्रमांक मिळविला.

# हिंगोली येथे होणाऱ्या विभागीय स्पर्धेसाठी निवड



**हिंगोली :** येथिल जय भवानी कनिष्ठ महाविद्यालयाचा ११वी कला वर्गाचा विद्यार्थी पै. प्रणव उर्फ गणेश अजिनाथ आवारे याने शालेय क्रिडा स्पर्धेत ८७ किलो वजन गटात गिरको रोमन कुस्ती स्पर्धेत तालुका स्तरीय स्पर्धेत सर्व प्रथम येऊन बीड येथिल जिल्हा स्तरीय स्पर्धेसाठी निवड झाली होती. बीड येथे जिल्हा स्टेडियम येथे संपन्न झालेल्या कुस्ती स्पर्धेत उत्कृष्ट खेळ करून जिल्हास्तरीय स्पर्धेत सर्व प्रथम येण्याचा बहुमान मिळवला. त्या बद्दल महाविद्यालयात पै. प्रणव आवारे याचा प्राचार्य डॉ. विश्वास कदम यांच्या शुभहस्ते सत्कार करण्यात आला. पै. प्रणव आवारे याच्या विजयाने महाविद्यालयाच्या शिरपेचात आजुन एक मानाचा तुरा रोवला आहे. पै. प्रणव आवारे यास श्री. बाळासाहेब (आबा)आवारे, पै. करण आवारे, पै. ज्ञानदेव सकुंडे क्रिडा विभागाचे प्रा. गोपाळ धांडे व प्रा.डॉ.प्रविण शिलेदार यांचे अनमोल मार्गदर्शन लाभले. पै. प्रणव उर्फ गणेश आवारे यांनी मिळविलेल्या यशा बद्दल संस्थचे संस्थापक अध्यक्ष माजी मंत्री मा.श्री.शिवाजीरावदादा पंडित, अध्यक्ष माजी आ. श्री अमरसिंह शिवाजीराव पंडित, सचिव मा.श्री. जयसिंह शिवाजीराव पंडित, आ.श्री.विजयसिंह पंडित युवा नेते श्री पृथ्वीदादा जयसिंह पंडित, शारदा स्पोर्टस क्लबचे कार्यवाह युवा नेते श्री. रणवीर काका अमरसिंह पंडित , विकास समितीचे सदस्य श्री. दिलीपभाऊ जाधव, मार्गदर्शक प्राचार्य डॉ. विश्वास कदम, प्राचार्य डॉ. सदाशिव सरकटे व सर्व प्राझ्ध्यापक वृंदानी पै. प्रणव आवारे याचे अभिनंदन! करून हिंगोली येथे होणाऱ्या विभागीय स्पर्धेसाठी हार्दिक शुभेच्छा.! दिल्या आहेत.

## दौलताबाद घाटात बस आणि स्पोर्ट्स बाईकचा भीषण अपघात
## वैजापूरच्या ३० वर्षीय तरुणाचा मृत्यू, एक गंभीर जखमी



**दौलताबाद (जावेद अहमद) :** दौलताबाद ते खुलताबाद रोडवरील दौलताबाद घाटात रविवारी दुपारी बस आणि दुचाकीचा भीषण अपघात झाला. या समोरासमोर झालेल्या जोरदार धडकेत एका ३० वर्षीय तरुणाचा रुग्णालयात उपचारादरम्यान दुर्दैवी मृत्यू झाला, तर दुसरा तरुण गंभीर जखमी झाला आहे. जखमी तरुणावर येथील घाटी रुग्णालयात उपचार सुरू आहेत.ही घटना रविवार, २७ सप्टेंबर २०२६ रोजी दुपारी ३:१५ वाजेच्या सुमारास दौलताबाद घाटातील मलिक हॉटेलसमोर घडली.वळणावर झाली समोरासमोर धडक झाली आहेमिळालेल्या माहितीनुसार, धुळे येथून छत्रपती संभाजीनगरच्या दिशेने येणारी एसटी बस (क्रमांक एमएच २० बीसी ३४३१) ५० ते ५५ प्रवाशांना घेऊन दौलताबाद घाट उतरत होती. यावेळी बसचे चालक मनोज पुजारी आणि वाहक गोकुळ डोंगरे हे कर्तव्यावर होते. घाट उतरत असतानाच, एका तीव्र वळणावर समोरून येणाऱ्या टीव्हीएस कंपनीच्या स्पोर्ट्स बाईकची (क्रमांक एमएच ५७ ए ८८२०) आणि बसची समोरासमोर अत्यंत भीषण धडक झाली.वैजापूरचे तरुण अपघाताचे बळीया भीषण अपघातात दुचाकीवरील दोन्ही तरुण गंभीररित्या जखमी झाले होते. अपघाताची माहिती मिळताच दौलताबाद पोलीस ठाण्याचे पोलीस उपनिरीक्षक अशोक सोनवणे, दीपक मते व सहकाऱ्यांनी तातडीने घटनास्थळी धाव घेतली. १०८ रुग्णवाहिका आणि नरेंद्र महाराज संस्थानच्या रुग्णवाहिकेच्या मदतीने दोन्ही जखमींना तातडीने घाटी रुग्णालयात दाखल केले असता डॉक्टरांनी अक्षय साहेबराव दवंगे (वय अंदाजे ३० वर्षे) या तरुणाला तपासून मृत घोषित केले. तर दुचाकीवरील दुसरा तरुण अक्षय कारभारी बोडखे (वय अंदाजे ३३ वर्षे) हा गंभीर जखमी झाला असून त्याची घाटी रुग्णालयात मृत्यूशी झुंज सुरू आहे. हे दोन्ही तरुण मनूर (ता. वैजापूर, जि. छत्रपती संभाजीनगर) येथील रहिवासी असल्याची माहिती पोलिसांनी दिली आहे.घाटातील धोकादायक वळणावर झालेल्या या अपघातामुळे काही काळ वाहतूक विस्कळीत झाली होती. दौलताबाद पोलीस या प्रकरणाचा पुढील तपास करत आहेत.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), सोमवार २८ सप्टेंबर २०२६


## गृहशास्त्र विषयाच्या तृतीय वर्षाच्या राष्ट्रीय शैक्षणिक धोरण अभ्यासक्रमावर कार्यशाळा संपन्न



**छत्रपती संभाजीनगर** : डॉ. (सौ.) इंदिराबाई भास्करराव पाठक महिला महाविद्यालय, छत्रपती संभाजीनगर येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या राष्ट्रीय शैक्षणिक धोरणांतर्गत गृहशास्त्र विषयाच्या तृतीय वर्षाच्या सुधारित अभ्यासक्रमाच्या अनुषंगाने एकदिवसीय कार्यशाळा उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाली. विद्यापीठाशी संलग्न विविध महाविद्यालयांतील गृहशास्त्र विषयाचे प्राध्यापक या कार्यशाळेस उपस्थित होते.कार्यशाळेच्या उद्घाटक व प्रमुख पाहुण्या डॉ. संध्या आयसकर, प्रभारी प्राचार्य तथा गृहशास्त्र विभागप्रमुख, महिला महाविद्यालय, बीड यांनी नवीन अभ्यासक्रमाची गरज, स्वरूप आणि महत्त्व स्पष्ट केले. राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाच्या अनुषंगाने विद्यार्थिकेंद्रित, कौशल्याधिष्ठित आणि अनुभवाधारित शिक्षणाला प्राधान्य देण्याची गरज त्यांनी अधोरेखित केली.कार्यशाळेत तृतीय वर्षाच्या नवीन अभ्यासक्रमातील प्रमुख विषय, गौण विषय, कौशल्याधिष्ठित अभ्यासक्रम तसेच इतर अभ्यासक्रमांचे स्वरूप, उद्दिष्टे, उपयुक्तता आणि अध्यापन-अध्ययनाच्या प्रभावी पद्धती यांवर सविस्तर चर्चा करण्यात आली. विद्यार्थिनींना केवळ पुस्तकी ज्ञान न देता प्रत्यक्ष अनुभवातून शिकण्याच्या दृष्टीने प्रात्यक्षिके, प्रकल्प, क्षेत्रभेटी, प्रशिक्षण, प्रकरणाधारित अध्ययन आणि अनुभवाधारित शिक्षणपद्धतींचा प्रभावी वापर करण्यावर विशेष भर देण्यात आला.अभ्यासक्रमातील प्रत्येक घटकाच्या माध्यमातून विद्यार्थिनींमध्ये अपेक्षित ज्ञान, कौशल्ये, क्षमता, सर्जनशीलता आणि समस्या सोडविण्याची क्षमता विकसित करण्यासाठी विविध अध्यापन पद्धती व उपक्रमांबाबत मार्गदर्शन करण्यात आले. तसेच बदलत्या सामाजिक, शैक्षणिक आणि रोजगाराच्या गरजा लक्षात घेऊन गृहशास्त्र विषयाच्या अध्यापनामध्ये नावीन्यपूर्ण दृष्टिकोन स्वीकारण्याची आवश्यकता व्यक्त करण्यात आली.कार्यशाळेत सहभागी प्राध्यापकांनी नवीन अभ्यासक्रमाच्या प्रभावी अंमलबजावणीतील संभाव्य अडचणी, महाविद्यालयांमध्ये उपलब्ध असलेल्या साधनसुविधा, अध्यापनाच्या विविध पद्धती तसेच विद्यार्थिनींच्या बदलत्या गरजा याबाबत आपले अनुभव व सूचना मांडल्या. विविध महाविद्यालयांमध्ये राबविण्यात येणाऱ्या नाविन्यपूर्ण शैक्षणिक उपक्रमांची देवाणघेवाण करून परस्पर सहकार्य वाढविण्याची गरजही यावेळी व्यक्त करण्यात आली.अध्यक्षीय समारोपप्रसंगी महाविद्यालयाच्या प्राचार्य तथा गृहशास्त्र विषय अभ्यास मंडळाच्या प्रभारी अध्यक्ष डॉ. अन्विता अग्रवाल यांनी अभ्यासक्रम केवळ पूर्ण करण्यापुरता मर्यादित न ठेवता त्याचा विद्यार्थिनींच्या सर्वांगीण विकासासाठी प्रभावीपणे उपयोग करण्याचे आवाहन केले. विद्यार्थिनींचे ज्ञान, कौशल्य, आत्मविश्वास, रोजगारक्षमता आणि उद्योजकतेच्या दृष्टीने सक्षम व्यक्तिमत्त्व घडविण्यात अभ्यासक्रमाची महत्त्वपूर्ण भूमिका असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. "अभ्यासक्रम आपण तयार केला आहे; मात्र त्याला अर्थपूर्ण बनविण्याची जबाबदारी आपण सर्व शिक्षकांची आहे," असे प्रतिपादन त्यांनी केले.कार्यशाळेच्या यशस्वी आयोजनासाठी गृहशास्त्र अभ्यास मंडळाच्या सर्व सदस्यांचे मार्गदर्शन लाभले. प्रा. मंगल मोरे, डॉ. वर्षा पाईकराव, डॉ. शिला जीरे, डॉ. नेत्रा शेळके, डॉ. वैभवी तोटे आणि डॉ. प्रियंका भिंगारे यांचे विशेष सहकार्य लाभले.कार्यशाळेच्या पहिल्या सत्राचे सूत्रसंचालन डॉ. वर्षा पाईकराव यांनी केले. दुसऱ्या सत्राचे संचालन डॉ. नेत्रा शेळके यांनी केले. प्रमुख पाहुण्यांचा परिचय डॉ. शिला जीरे यांनी करून दिला, तर आभार प्रदर्शन डॉ. वैभवी तोटे यांनी केले.राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाच्या पार्श्वभूमीवर गृहशास्त्र विषयाच्या तृतीय वर्षाच्या अभ्यासक्रमाची प्रभावी अंमलबजावणी, अध्यापनातील नावीन्य आणि विद्यार्थिनींच्या कौशल्यविकासासाठी आवश्यक दिशादर्शन करणारी ही कार्यशाळा शैक्षणिकदृष्ट्या महत्त्वपूर्ण ठरली.


**बातम्या व जाहिरातीसाठी संपर्क 7588005002**

**महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे.**
**कृपया दुपारी 12 ते रात्री 8 या वेळेत संपर्क करा.**
**संपर्क क्र. 7588005002**


## कलियुगाची रीत

सांगतो मित्रांनो तुम्हाला,
आज कलियुगाची रीत
कळ लावून दोघांमध्ये,
कळलाव्या गातो गीत. 1

सदा खोटे-नाटे सांगून,
डाव आपला साधतो.
कान फुकून एकमेकांचे,
भल्याभल्यांना तोडतो. 2

एकमेकात लावून वाद,
प्रिय मित्रांना दूर सारतो.
कान भरून भरून मित्रांचे,
सत्य विचारांना मारतो. 3

स्वतः सर्वांना दूर सारून,
स्वतःचीच पोळी भाजतो.
कुठल्याही कामाचे श्रेय,
स्वतःच वाजवून गाजतो. 4

जसे वारे तसे वाहणे,
कलियुगाची रीत आहे.
लावालावी करणारा,
कळ लावून तमाशा पाहे. 5

कलियुगात मित्रांनो सदैव,
खोट्या पासून रहावे दूर,
नाहीतर येईल तुमच्या,
जीवनात संकटाचे पूर. 6



**नागेश बोंतेवाड,**
**छत्रपती संभाजीनगर**

## बाप्पाला निरोप

अनंत चतुर्दशीला
मनी दाटे हुरहूर
निरोप देताना बाप्पाला
डोळयात अश्रूंचा पूर

ढोल ताशांच्या गजरात
बाप्पाला मिरवत नेऊया
गुलाल उधळीत सारे
जयघोष बाप्पाचा करूया

मतभेद विसरूनी
नाचूया आपण सर्वजण
जाती धर्माचे बंध तोडूनी
एकतेची घेऊ शिकवण

घेतो निरोप तुझा आता
विघ्नहर्ता गजानना
जावी निघून संकटे सारी
तुझ्या चरणी हीच प्रार्थना

दहा दिवस कसे गेले
कळले नाही कुणा
पुढच्या वर्षी बाप्पा
ये लवकर पुन्हा



**- रवींद्र चालीकवार**
**मु.पो.ता.महागाव**
**जि.यवतमाळ**
**मो.9011559106**




# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), सोमवार २८ सप्टेंबर २०२६


## भास्कर पोले नाईक यांच्यावर काँग्रेसच्या ओबीसी हिंगोली जिल्हाध्यक्ष पदाची धुरा



**हिंगोली :** ऑल इंडिया काँग्रेस कमिटीचे ओबीसी विभागाचे राष्ट्रीय अध्यक्ष डॉ अनिल जयहिंद व ओबीसी महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष प्रा यशपाल भिंगे यांनी नुकतीच संपूर्ण महाराष्ट्र भरात विविध जिल्ह्यातील जिल्हाध्यक्ष व इतर पदावर अनेकांच्या निवडी एका प्रसिद्धी पत्रामध्ये जाहीर केल्या यामध्ये हिंगोली जिल्ह्यातील औंढा नागनाथ तालुक्यातील दुधाळा येथील काँग्रेसचे एकनिष्ठ व सच्चे कार्यकर्ते म्हणून ओळख असलेले भास्करराव पोले नाईक यांच्यावर काँग्रेसच्या ओबीसी विभागाच्या हिंगोली जिल्हाध्यक्ष पदाची धुरा सोपवण्यात आली.भास्करराव पोले हे मागील अनेक वर्षांपासून काँग्रेसच्या विचारधारेवर चालणारे दिवंगत ससंदरत्न खासदार स्व.राजीवभाऊ सातव यांचे विश्वासू कार्यकर्ते म्हणून सर्वपरिचित आहेत त्यांनी जिल्हा उपाध्यक्ष सेवादल तालुकाध्यक्ष अशा अनेक पदावर काम केले त्यांनी पक्षात सर्व समाज घटकांना न्याय मिळण्यासाठी वेळोवेळी आंदोलने करून शेतकरी शेतमजूर व दिव्यांग व युवक इत्यादी घटक त्यांना येणाऱ्या अडीअडचणी सोडवण्याचे काम केले त्यांच्याबरोबर ते तंटामुक्ती अध्यक्ष म्हणून चांगल्या प्रकारे काम केले आहे विशेष म्हणजे ओबीसी समाजातील धनगर समाजातील मोठे नेते म्हणून त्यांची ओळख आहे त्यांच्या या कामामुळे त्यांच्यावर ही जिम्मेदारी सोपवल्याचे बोलले जात आहे.या निवडीबद्दल भास्करराव पोले म्हणाले की येणाऱ्या काळात होऊ घातलेल्या जिल्हा परिषद व पंचायत समिती त्याचबरोबर नगरपंचायत इत्यादी स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीत काँग्रेस पक्ष तळागाळापर्यंत जाण्यासाठी मी ओबीसी विभागाचे काम हिंगोली जिल्ह्यातील पाची तालुक्यातील सर्व ओबीसी घटकातील समूहांना एकत्रित करून पक्षाला गत वैभव निर्माण करून देणार असल्याचेही नूतन काँग्रेस कमिटीचे ओबीसी विभागाचे हिंगोली जिल्हाध्यक्ष भास्कर पोले नाईक यांनी सांगितले.या निवडीबद्दल काँग्रेस कमिटीचे वरिष्ठ प्रदेश उपाध्यक्ष सचिनजी नाईक काँग्रेस जिल्हा कमिटीचे जिल्हाध्यक्ष सतीश पाचपुते सुरेश आप्पा सराफ जक्की कुरेशी अब्दुल हाफिज प्रदेश सचिव साहेबराव देवकते युवक काँग्रेस प्रदेश सचिव बंटी नागरे औंढा नागनाथ तालुकाध्यक्ष प्रदीपराव पोले वसमत तालुकाध्यक्ष ऋषिकेश देशमुख सेनगाव तालुकाध्यक्ष निळकंठ गडदे जिल्हा सरचिटणीस किशन जुमडे विशाल घुगे डॉ किशोर शिंदे गजानन कवडे संदीप कुंडकर संतोष पोले दिपक सोनूळे यांनी निवडीबद्दल शुभेच्छा दिल्या.

## श्री छत्रपती शिवाजी महाविद्यालयात २९ आणि ३० सप्टेंबर रोजी श्रीधररावजी मोरे व्याख्यानमालेचे आयोजन



**उमरगा :** उमरगा तालुक्यात स्वातंत्र्यपूर्व काळखंडात स्थापना झालेल्या भारत शिक्षण संस्थेचे माजी अध्यक्ष कर्मयोगी श्रीधररावजी मोरे यांच्या स्मृतिदिनाचे औचित्य साधून शहरातील श्री छत्रपती शिवाजी महाविद्यालयात 29 आणि 30 सप्टेंबर रोजी दुपारी 02 वाजता व्याख्यानमालेचे आयोजन करण्यात आले आहे. श्री छत्रपती शिवाजी महाविद्यालयाच्या वतीने गेल्या 23 वर्षांपासून दरवर्षी या व्याख्यानमालेचे आयोजन करण्यात येते. विविध सामाजिक विषयांच्या संदर्भात नवयुवकांमध्ये जाणिवा आणि जागृती घडविण्यासाठी विचारमंथन घडवून आणणे हा या व्याख्यानमालेचा उद्देश आहे.निजाम राजवटीत 1941 साली भारत शिक्षण संस्थेची स्थापना या भागाच्या सर्वांगीण विकासासाठी उदात हेतूने केली होती. शिक्षण हीच प्रगतीची पहिली पायरी ओळखून भारत शिक्षण संस्थेने श्री छत्रपती शिवाजी महाविद्यालयाच्या माध्यमातून या भागात उच्च शिक्षणाची सुविधा उपलब्ध करून दिली. या संस्थेच्या आणि महाविद्यालयाच्या विकासात कर्मयोगी श्रीधरराव मोरे यांची भूमिका महत्त्वाची राहिली आहे. त्यामुळे त्यांच्या स्मृती प्रित्यर्थ 29 आणि 30 सप्टेंबर रोजी दोन दिवशीय व्याख्यानमालेचे आयोजन करण्यात आले आहे. दिनांक 29 सप्टेंबर रोजी सांगली येथील प्रसिद्ध कवी मा. नितीन चंदनशिवे यांचे ' माझं जगणं, माझी कविता' या विषयावर पहिले व्याख्यान पुष्प आयोजित केले आहे. 30 सप्टेंबर रोजी जळगाव येथील सुप्रसिद्ध कवयित्री माननीय गुंजन पाटील यांचे 'मूल्ये संस्कार जपूया, माणूस घडवूया' या विषयावर दुसरे व्याख्यान आयोजित केले आहे.या दोन दिवसीय व्याख्यानमालेस शिक्षणप्रेमी बांधव, विद्यार्थी आणि नागरिकांनी उपस्थित रहावे असे आवाहन प्राचार्य डॉ. संजय अस्वले आणि संयोजन समितीने केले आहे.

## कोकण व नाशिक विभागात ४१८ हून अधिक रोजगार मेळावे; २५ हजारांहून अधिक रोजगार संधी

**मुंबई :** राज्यातील युवक-युवतींना रोजगाराच्या थेट संधी उपलब्ध करून देण्यासाठी ‘पंडित दीनदयाळ उपाध्याय विश्वविक्रमी रोजगार महाकुंभ महाराष्ट्र’चा राज्यस्तरीय शुभारंभ मंगळवार, दि. २९ सप्टेंबर २०२६ रोजी सकाळी ११ वाजता मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते होणार आहे. कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता मंत्री मंगलप्रभात लोढा यांच्या संकल्पनेतून आयोजित हा कार्यक्रम श्रीमती नाथीबाई दामोदर ठाकरसी (एसएनडीटी) महिला विद्यापीठ, चर्चगेट येथे होणार आहे. याच दिवशी कोकण व नाशिक विभागातील रोजगार मेळावे होणार आहेत.या कार्यक्रमाला उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार, विधानसभा अध्यक्ष ॲड. राहुल नार्वेकर, उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील, कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता मंत्री मंगलप्रभात लोढा, उद्योगमंत्री उदय सामंत, मंत्री जयकुमार रावल, मंत्री आकाश फुंडकर, खासदार मिलिंद देवरा, खासदार अरविंद सावंत, महापौर रितू तावडे,यांच्यासह, बृहन्मुंबई महापालिकेच्या आयुक्त अश्विनी भिडे अपर मुख्य सचिव मनीषा वर्मा, मुंबई शहरच्या जिल्हाधिकारी आंचल गोयल, श्रीमती नाथीबाई दामोदर ठाकरसी महिला विद्यापीठाच्या कुलगुरू प्रो. हेमलता बागला, रतन टाटा महाराष्ट्र राज्य कौशल्य विद्यापीठाच्या कुलगुरू डॉ. अपूर्वा पालकर, आयुक्त डॉ. अमित सैनी, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालयाचे संचालक सतीश सुर्यवंशी यासह वरिष्ठ अधिकारी आणि मान्यवर उपस्थित राहणार आहेत.कोकण व नाशिक विभागात ४१८ रोजगार मेळावे कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभागाच्या या उपक्रमांतर्गत कोकण व नाशिक विभागातील सर्व जिल्ह्यांत ४१८ हून अधिक रोजगार मेळावे आयोजित करण्यात आले आहेत. या उपक्रमात कोकण विभागातील मुंबई शहर, मुंबई उपनगर, ठाणे, पालघर, रायगड, रत्नागिरी व सिंधुदुर्ग तसेच नाशिक विभागातील नाशिक, अहिल्यानगर, जळगाव, धुळे व नंदुरबार या १२ जिल्ह्यांचा समावेश आहे. या मेळाव्यांमधून स्थानिक स्तरावर २५ हजारांहून अधिक रोजगार संधी उपलब्ध होणार आहेत. या महाकुंभ मध्ये १ हजार ५०० हून अधिक नामांकित कंपन्या आणि आस्थापना सहभागी होणार आहेत. उमेदवारांची शैक्षणिक पात्रता, कौशल्य आणि अनुभव उपलब्ध रिक्त पदांशी जोडण्यासाठी ‘उमेदवार—रिक्त पद जुळवणी’ करण्यात येणार आहे. त्यामुळे युवक-युवतींना थेट रोजगार संधींसह उद्योगांच्या मनुष्यबळविषयक गरजा, आवश्यक कौशल्ये आणि विविध क्षेत्रांतील करिअर संधींची माहिती मिळेल. उद्योगांनाही आवश्यक मनुष्यबळ निवडण्याची सुविधा उपलब्ध होईल. उमेदवारांना मुलाखतीसाठी सक्षम करण्याच्या उद्देशाने संवाद कौशल्य, व्यक्तिमत्व विकास आणि सॉफ्ट स्किल्सचे प्लेसमेंटपूर्व प्रशिक्षण देण्यात येणार आहे. रोजगार महाकुंभ मध्ये सहभागी होण्यासाठी उमेदवार आणि उद्योजकांना क्यूआर कोडद्वारे नोंदणी करता येईल. अधिक माहिती व मार्गदर्शनासाठी इच्छुकांनी स्थानिक औद्योगिक प्रशिक्षण संस्था (आयटीआय) किंवा जिल्हा सहायक आयुक्त, कौशल्य विकास, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता मार्गदर्शन केंद्राशी संपर्क साधावा, असे आवाहन विभागाने केले आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी महिलां विषयी केलेल्या विधायक कार्याबद्दल आयोजित राज्यस्तरीय निबंध स्पर्धेतील विजेत्यांनाही सन्मानचिन्ह, पुरस्कार देऊन गौरविण्यात येणार असून याच शासकीय कार्यक्रमात राज्यातून द्वितीय क्रमांकाने विजेत्या आणि वंदेमातरम आयटीआय कॉलेज, अंबाजोगाई या कॉलेजची विद्यार्थिनी कु.संस्कृती उषा भगवंत पाळवदे हिस सन्मानित करून गौरविण्यात येणार आहे एसएनडीटी महिला विद्यापीठात ‘लाडक्या बहिणीं’साठी विशेष रोजगार मेळावाया महाकुंभांतर्गत एसएनडीटी महिला विद्यापीठात ‘लाडक्या बहिणीं’साठी स्वतंत्र रोजगार मेळावा आयोजित करण्यात आला आहे. त्यात सुमारे ६०० ते ७०० महिला उमेदवार सहभागी होणार आहेत. विविध कंपन्यांच्या स्टॉलवर महिलांना उपलब्ध पदे, आवश्यक पात्रता, कामाचे स्वरूप, वेतनश्रेणी आणि भरती प्रक्रियेची थेट माहिती मिळेल. कंपनी प्रतिनिधींशी संवाद साधण्याबरोबरच त्यांना मुलाखती देण्याची संधीही मिळणार आहे. महिलांच्या कौशल्याला रोजगाराची जोड देऊन त्यांच्या आर्थिक स्वावलंबनाला चालना देणे हा या विशेष मेळाव्याचा उद्देश आहे




महाराष्ट्र जनशक्ती
website: www.maharashtrajanshaktinews.com
छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), सोमवार २८ सप्टेंबर २०२६

# पोषण सप्ताहापासून पोषण संस्कृतीकडे: महाराष्ट्रासमोरील आव्हाने आणि नव्या वाटा

"पोट भरणे म्हणजे पोषण नव्हे; शरीर, मेंदू आणि भवितव्य घडविण्यासाठी योग्य पोषण आवश्यक आहे."सप्टेंबर महिना आला की देशभर पोषणविषयक जनजागृतीला वेग येतो. पोषण हा केवळ आरोग्य विभागाचा किंवा महिला व बालविकास विभागाचा विषय नसून तो समाजाच्या भवितव्याशी जोडलेला प्रश्न आहे. निरोगी बालक, सुदृढ माता, सक्षम किशोरवयीन पिढी आणि कार्यक्षम नागरिक यांचा पाया योग्य पोषणावर उभा असतो. त्यामुळे पोषणाबाबतची चर्चा एखाद्या सप्ताहापुरती किंवा महिन्यापुरती मर्यादित न राहता ती कुटुंबाच्या ताटापासून गावाच्या विकासापर्यंत पोहोचणे आवश्यक आहे. भारतामध्ये १ ते ७ सप्टेंबरदरम्यान राष्ट्रीय पोषण सप्ताहाबाबत जनजागृती केली जाते; त्याचबरोबर सप्टेंबर महिना राष्ट्रीय पोषण माह म्हणूनही राबविला जातो. २०२६ मधील नववा राष्ट्रीय पोषण माह ९ सप्टेंबर ते ८ ऑक्टोबर या कालावधीत "हमारी आंगनवाड़ी, हमारी जिम्मेदारी" या संकल्पनेखाली सुरू करण्यात आला आहे. यंदाच्या अभियानात आहारातील विविधता, पुरेसे प्रथिन, ताजे गरम अन्न, बालविकास आणि अंगणवाडी केंद्रांमध्ये समुदायाचा सहभाग यावर विशेष भर देण्यात आला आहे. महाराष्ट्रातील पोषणाचे वास्तव महाराष्ट्र हे आर्थिकदृष्ट्या प्रगत आणि औद्योगिकदृष्ट्या आघाडीचे राज्य असले तरी पोषणाच्या क्षेत्रात काही गंभीर आव्हाने अद्याप कायम आहेत. उपलब्ध NFHS-5 (२०१९—२१) आकडेवारीनुसार, महाराष्ट्रात पाच वर्षांखालील मुलांमध्ये ३५.२ टक्के मुले वयानुसार खुजी (stunted), २५.६ टक्के मुले उंचीच्या तुलनेत कमी वजनाची (wasted) आणि ३६.१ टक्के मुले वयानुसार कमी वजनाची (underweight) होती. ग्रामीण भागातील ही प्रमाणे अनुक्रमे ३५.५, २७.३ आणि ३८ टक्के होती. याच आकडेवारीतून आणखी एक महत्त्वाचा मुद्दा समोर येतो. सहा ते २३ महिन्यांच्या मुलांपैकी केवळ ९ टक्के मुलांना पुरेसा आहार मिळत असल्याचे नोंदले गेले. म्हणजेच केवळ अन्नाची उपलब्धता पुरेशी नाही; मुलांच्या वयानुसार योग्य प्रमाणात आणि विविध अन्नगटांचा समावेश असलेला आहार मिळणे अधिक महत्त्वाचे आहे. यामुळे महाराष्ट्रासमोरील पोषणाचे आव्हान हे केवळ "अन्नाची कमतरता" एवढे साधे राहिलेले नाही. आहारातील विविधता, सूक्ष्म पोषकतत्त्वे, प्रथिने, मातांचे आरोग्य, बालकांचा पूरक आहार आणि जीवनशैलीतील बदल या सर्व बाबींचा एकत्रित विचार करावा लागतो.कुपोषणाचे बदलते स्वरूप पूर्वी कुपोषण म्हटले की गरिबी, उपासमार आणि अपुरा आहार हे प्रमुख घटक मानले जात. आज परिस्थिती अधिक गुंतागुंतीची झाली आहे. एका बाजूला कमी वजन, खुजेपणा आणि रक्तक्षय यांसारख्या समस्या आहेत; तर दुसऱ्या बाजूला अतिप्रक्रियायुक्त अन्न, साखरयुक्त पेये, जास्त मीठ-चरबीयुक्त पदार्थ आणि शारीरिक हालचालींचा अभाव यामुळे स्थूलतेसारख्या समस्या वाढत आहेत. म्हणजेच आज समाजासमोर "कुपोषणाचे दुहेरी ओझे" आहे. गरीब कुटुंबातील मुलाला पुरेसे पोषक अन्न मिळत नाही, तर आर्थिकदृष्ट्या सक्षम कुटुंबातील मुलाच्या आहारात पोषकतत्त्वांपेक्षा प्रक्रिया केलेल्या खाद्यपदार्थांचे प्रमाण वाढत आहे. त्यामुळे पोषणाचा प्रश्न हा आर्थिक स्थितीपुरता मर्यादित न राहता आहाराच्या गुणवत्तेचा प्रश्न बनला आहे.मातेच्या पोषणापासून बालकाच्या भवितव्यापर्यंतबालकाच्या आरोग्याची सुरुवात जन्मानंतर नव्हे, तर गर्भधारणेपूर्वी आणि गर्भधारणेपासून होते. आईचे पोषण, गर्भावस्थेतील काळजी, प्रसूतीनंतरचे पोषण, स्तनपान आणि सहा महिन्यांनंतरचा पूरक आहार या सर्वांचा बालकाच्या शारीरिक आणि बौद्धिक विकासाशी संबंध आहे.NFHS-5 नुसार महाराष्ट्रात १५ ते ४९ वर्षे वयोगटातील महिलांमध्ये रक्तक्षयाचे प्रमाण ५४.२ टक्के होते. हा आकडा केवळ महिलांच्या आरोग्याचा प्रश्न नाही. मातेला योग्य पोषण मिळाले नाही, तर त्याचा परिणाम गर्भधारणा, प्रसूती आणि बालकाच्या आरोग्यावर होऊ शकतो. त्यामुळे "सुपोषित बालक" निर्माण करण्यासाठी "सुपोषित माता" हा पहिला टप्पा मानला पाहिजे.अंगणवाडी : पोषण व्यवस्थेची महत्त्वाची कडीमहाराष्ट्राच्या ग्रामीण आणि शहरी भागातील पोषण व्यवस्थेत अंगणवाडी केंद्रांची भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे. सहा वर्षांपर्यंतची मुले, गर्भवती महिला आणि स्तनदा माता यांच्यापर्यंत पोषणविषयक सेवा पोहोचविण्यात अंगणवाडी कार्यकर्त्या आणि मदतनीसांची भूमिका महत्त्वाची आहे.महाराष्ट्र महिला व बालविकास विभागानुसार सक्षम अंगणवाडी व पोषण २.० अंतर्गत कुपोषणाला सामोरे जाण्यासाठी पूरक पोषण, पोषणविषयक जनजागृती आणि आरोग्यविषयक चांगल्या सवयी यांना एकत्रितपणे प्रोत्साहन दिले जात आहे. २०२६ च्या राष्ट्रीय पोषण माहमध्येही अंगणवाडी केंद्रांना केवळ पूरक आहार देणारी ठिकाणे न मानता पोषण, आरोग्य, काळजी आणि बालविकासाची समुदाय-केंद्रे बनविण्यावर भर देण्यात आला आहे. तंत्रज्ञानातून पोषणाचे निरीक्षण पोषण व्यवस्थेत डिजिटल तंत्रज्ञानाचा वापर ही अलीकडील महत्त्वाची बाब आहे. Poshan Trackerच्या माध्यमातून अंगणवाडी सेवा, मुलांची वाढ, उपस्थिती, पूरक पोषण आहार, गृहभेटी आणि पोषणविषयक विविध बाबींचे जवळपास वास्तविक वेळेत निरीक्षण करण्याची व्यवस्था करण्यात आली आहे. २०२६ मध्ये केंद्र सरकारने या डिजिटल व्यवस्थेला पोषण परिणामांच्या निरीक्षणासाठी महत्त्वाचे साधन म्हणून अधोरेखित केले आहे. मात्र डिजिटल नोंदणी आणि प्रत्यक्ष पोषण परिणाम यात फरक आहे. त्यामुळे "किती लाभार्थ्यांची नोंद झाली?" यापेक्षा "किती मुलांचे पोषण सुधारले?" हा प्रश्न अधिक महत्त्वाचा ठरणार आहे. महाराष्ट्राच्या ताटातच आहे पोषणाची ताकदपोषणासाठी नेहमी महागडे पदार्थ आवश्यक असतात, हा गैरसमज दूर करणे गरजेचे आहे. महाराष्ट्राच्या पारंपरिक खाद्यसंस्कृतीतच अनेक पौष्टिक पर्याय उपलब्ध आहेत.ज्वारी, बाजरी, नाचणी, विविध डाळी, कडधान्ये, हरभरा, मूग, मटकी, शेंगदाणे, तीळ, हिरव्या पालेभाज्या, हंगामी फळे, दूध आणि दुग्धजन्य पदार्थ यांचा संतुलित वापर आहार अधिक पौष्टिक करू शकतो.२०२६ च्या राष्ट्रीय पोषण माहमध्येही विविध अन्नगटांचा समावेश असलेला आहार आणि पुरेशा प्रथिनांच्या सेवनावर भर देण्यात आला आहे. स्थानिक आणि परवडणाऱ्या पदार्थांपासून पौष्टिक पाककृती तयार करण्याचे प्रात्यक्षिकही अभियानाचा भाग आहे. विशेषतः मराठवाड्यासारख्या दुष्काळप्रवण भागात स्थानिक शेती, पाणी, अन्नसुरक्षा आणि पोषण यांचा परस्परसंबंध लक्षात घेणे आवश्यक आहे. शेतीत केवळ बाजारमूल्य असलेल्या पिकांवर भर न देता कुटुंबाच्या पोषण गरजांसाठी कडधान्ये, भरडधान्ये, भाजीपाला आणि फळपिकांची उपलब्धता वाढविण्याचा विचार होणे गरजेचे आहे. पोषणासाठी समाजाची सामूहिक जबाबदारीपोषण ही केवळ शासनाची जबाबदारी नाही. कुटुंब, अंगणवाडी, शाळा, ग्रामपंचायत, आरोग्य यंत्रणा, स्वयंसेवी संस्था, महिला बचतगट आणि स्थानिक समुदाय यांनी एकत्रितपणे काम करण्याची आवश्यकता आहे.२०२६ च्या पोषण माहची मध्यवर्ती संकल्पनाच "आपली अंगणवाडी, आपली जबाबदारी" अशी आहे. अंगणवाडी व्यवस्थापन समित्या, स्थानिक समुदायाचा सहभाग आणि पूरक पोषण आहाराच्या मेनूची माहिती सार्वजनिक करण्यावरही भर देण्यात आला आहे. याचा अर्थ पोषणाचा प्रश्न सरकारी कार्यालयातून बाहेर काढून गावाच्या चौकात, शाळेत, अंगणवाडीत आणि प्रत्येक कुटुंबाच्या स्वयंपाकघरात घेऊन जाण्याची गरज आहे.आता घोषणांपेक्षा कृतीची गरजपोषण सप्ताह किंवा पोषण माह निमित्त रॅली, व्याख्याने, पोस्टर आणि जनजागृती कार्यक्रम होणे आवश्यकच आहे; परंतु त्यापलीकडे जाऊन प्रत्येक गावाने काही ठोस उद्दिष्टे निश्चित करणे गरजेचे आहे.प्रत्येक अंगणवाडीतील मुलांची नियमित वाढ तपासणे, कमी वजनाच्या मुलांना वेळेत ओळखणे, गर्भवती महिलांना योग्य आहाराबाबत मार्गदर्शन करणे, किशोरवयीन मुलींच्या रक्तक्षयाकडे लक्ष देणे, स्थानिक पौष्टिक पदार्थांचा वापर वाढविणे आणि कुटुंबांमध्ये आहारविषयक जागरूकता निर्माण करणे ही कामे सातत्याने झाली पाहिजेत.पोषण सुधारले तर त्याचा परिणाम केवळ आरोग्यावर होत नाही. निरोगी बालकाची शिकण्याची क्षमता वाढते, भविष्यातील कार्यक्षमता सुधारते आणि समाजाच्या मानवी भांडवलाची गुणवत्ता उंचावते. म्हणूनच पोषणाकडे खर्च म्हणून नव्हे, तर भविष्यातील पिढीवरील गुंतवणूक म्हणूनपाहिले पाहिजे.निष्कर्ष : 'सुपोषित महाराष्ट्र' ही सामूहिक संकल्पनामहाराष्ट्राने आर्थिक, औद्योगिक, कृषी आणि तंत्रज्ञान क्षेत्रात मोठी प्रगती केली आहे. आता या विकासाला सुपोषित नागरिकांची भक्कम जोडदेण्याची गरज आहे.पोषण सप्ताह किंवा पोषण माह हा केवळ दिनविशेष नाही; तो आपल्या आहारपद्धतीकडे, मातांच्या आरोग्याकडे, मुलांच्या वाढीकडे आणि समाजाच्या भवितव्याकडे नव्याने पाहण्याची संधी आहे.प्रत्येक घरातील ताट पोषक झाले, प्रत्येक अंगणवाडी सक्षम झाली, प्रत्येक माता निरोगी झाली आणि प्रत्येक बालकाला योग्य पोषण मिळाले, तरच महाराष्ट्राचा विकास खऱ्या अर्थाने सर्वसमावेशक ठरेल.आज गरज आहे ती केवळ "कुपोषणमुक्त महाराष्ट्र" म्हणण्याची नाही, तर "सुपोषित महाराष्ट्र" घडविण्यासाठी घराघरातून कृती करण्याची.कारण शेवटी—"सुदृढ बालक म्हणजे सुदृढ समाज आणि सुदृढ समाज म्हणजे सक्षम महाराष्ट्र."



**लेखक: प्रा डॉ नामदेव (देवा) वैजनाथ कचरे संत ज्ञानेश्वर महाविद्यालय सोयगाव, ता. सोयगाव, छ. संभाजीनगर**

महाराष्ट्र जनशक्ती
website: www.maharashtrajanshaktinews.com
छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), सोमवार २८ सप्टेंबर २०२६

# माहितीचा अधिकार : लोकशाहीची पारदर्शक खिडकी - डॉ. राजेंद्र बगाटे

लोकशाही म्हणजे केवळ मतदानाचा अधिकार नव्हे, तर शासनाच्या कारभाराविषयी जाणून घेण्याचा, प्रश्न विचारण्याचा आणि सार्वजनिक संस्थांकडून उत्तरदायित्वाची अपेक्षा करण्याचा नागरिकांचा अधिकारही होय. शासनाच्या निर्णयांची माहिती नागरिकांपासून दूर राहिली, सार्वजनिक निधीच्या वापराबाबत पारदर्शकता राहिली नाही आणि प्रशासनाच्या कामकाजाविषयी प्रश्न विचारण्याची संधी मर्यादित झाली, तर लोकशाहीची प्रक्रिया केवळ औपचारिक ठरू शकते. म्हणूनच लोकशाहीमध्ये माहितीला अनन्यसाधारण महत्त्व आहे. नागरिकांना माहिती उपलब्ध करून देणे म्हणजे त्यांना केवळ कागदपत्रे देणे नव्हे, तर सार्वजनिक जीवनात अधिक अर्थपूर्ण सहभागाची संधी देणे होय. याच व्यापक संकल्पनेचे महत्त्व अधोरेखित करणारा २८ सप्टेंबर हा 'आंतरराष्ट्रीय माहिती अधिकार दिन' म्हणून जगभर पाळला जातो.संयुक्त राष्ट्र शैक्षणिक, वैज्ञानिक व सांस्कृतिक संघटनेने म्हणजेच युनेस्कोने माहितीच्या सार्वत्रिक प्रवेशाचे महत्त्व अधोरेखित करण्यासाठी २८ सप्टेंबर हा दिवस निश्चित केला. पुढे संयुक्त राष्ट्रांच्या महासभेनेही या दिवसाला आंतरराष्ट्रीय मान्यता दिली. माहितीपर्यंत समान आणि प्रभावी प्रवेश हा शाश्वत विकास, लोकशाही सहभाग, सामाजिक समावेशन आणि मानवी हक्कांच्या दृष्टीने महत्त्वाचा असल्याचे या दिवसाच्या निमित्ताने अधोरेखित केले जाते.

माहिती ही आजच्या ज्ञानाधारित समाजातील मूलभूत सामाजिक संपत्ती बनली आहे. शिक्षण, रोजगार, आरोग्य, सामाजिक सुरक्षा, प्रशासन, अर्थव्यवस्था आणि सार्वजनिक धोरणे अशा जवळपास प्रत्येक क्षेत्रात योग्य वेळी मिळणारी अचूक माहिती व्यक्तीच्या निर्णयक्षमतेवर परिणाम करते.भारताच्या संदर्भात माहितीच्या अधिकाराला विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे. 'माहितीचा अधिकार अधिनियम, २००५' हा भारतीय लोकशाहीच्या वाटचालीतील महत्त्वाचा कायदा मानला जातो. या कायद्याचा मुख्य उद्देश सार्वजनिक प्राधिकरणांच्या नियंत्रणाखाली असलेल्या माहितीपर्यंत नागरिकांना प्रवेश उपलब्ध करून देणे आणि शासनव्यवस्थेत पारदर्शकता व उत्तरदायित्व वाढविणे हा आहे. सार्वजनिक कामकाजात पारदर्शकता वाढल्यास नागरिकांना शासनाच्या निर्णयांची प्रक्रिया समजून घेणे, सार्वजनिक निधीचा वापर तपासणे आणि प्रशासनाकडून अपेक्षित उत्तर मागणे अधिक सुलभ होते. त्यामुळे माहितीचा अधिकार हा प्रशासनावरील अविश्वासाचे प्रतीक नसून लोकशाहीतील उत्तरदायित्वाची संस्थात्मक व्यवस्था म्हणून पाहणे आवश्यक आहे.माहितीचा अधिकार नागरिकाला शासनाच्या दैनंदिन कामकाजाशी जोडतो. एखाद्या गावात रस्ता बांधण्यासाठी निधी मंजूर झाला असेल, पाणीपुरवठा योजना राबविण्यात आली असेल, शासकीय इमारतीचे बांधकाम झाले असेल किंवा एखाद्या कल्याणकारी योजनेची अंमलबजावणी सुरू असेल, तर त्या कामाशी संबंधित उपलब्ध अधिकृत नोंदींबाबत नागरिक माहिती मागू शकतो. मंजुरीचे आदेश, खर्चाशी संबंधित नोंदी, कामाची प्रगती, उपलब्ध अहवाल किंवा कायद्याच्या चौकटीत येणारी इतर माहिती नागरिकांसाठी सार्वजनिक उत्तरदायित्वाचा आधार बनू शकते. अशा प्रक्रियेमुळे 'शासन काय करते?' हा प्रश्न केवळ चर्चेचा विषय न राहता अधिकृत नोंदींच्या आधारे तपासता येण्याजोगा ठरतो.या कायद्याचे महत्त्व विशेषतः ग्रामीण भारताच्या संदर्भात अधोरेखित होते. गावातील नागरिकांना पाणी, रस्ते, वीज, स्वच्छता, आरोग्य, शिक्षण, रोजगार, घरकुल, सामाजिक सुरक्षा आणि विविध शासकीय योजनांशी संबंधित अनेक प्रश्नांना सामोरे जावे लागते. एखादी योजना कागदावर उपलब्ध असली, तरी तिची माहिती प्रत्यक्ष लाभार्थ्यांपर्यंत पोहोचली नाही तर त्या योजनेचा अपेक्षित सामाजिक परिणाम मर्यादित राहू शकतो. त्यामुळे शासनाच्या योजना आणि नागरिक यांच्यामधील माहितीची दरी कमी करणे आवश्यक आहे. स्थानिक भाषेत, सोप्या स्वरूपात आणि सहज उपलब्ध माध्यमातून माहिती देणे हे प्रशासनाच्या लोकाभिमुखतेचे महत्त्वाचे लक्षण ठरते.माहितीचा अधिकार सामाजिक न्यायाच्या दृष्टीनेही महत्त्वाचा आहे. समाजातील आर्थिकदृष्ट्या सक्षम आणि शिक्षित व्यक्तींना कार्यालयीन प्रक्रिया समजून घेणे तुलनेने सोपे असते; परंतु ग्रामीण, आदिवासी, वंचित, महिला, दिव्यांग आणि आर्थिकदृष्ट्या दुर्बल नागरिकांसमोर माहितीपर्यंत पोहोचण्याची अतिरिक्त आव्हाने असू शकतात. माहितीचा अधिकार या नागरिकांना आपल्या हक्कांबाबत प्रश्न विचारण्यासाठी कायदेशीर चौकट उपलब्ध करून देतो. मात्र कायदा अस्तित्वात असणे पुरेसे नाही. माहितीचा अधिकार प्रभावी होण्यासाठी नागरिकांना या कायद्याची जाणीव, अर्ज करण्याची प्रक्रिया, संबंधित सार्वजनिक प्राधिकरणाची माहिती आणि अपीलच्या तरतुदी याबाबत मार्गदर्शन मिळणे आवश्यक आहे.माहितीच्या अधिकारामुळे नागरिक आणि शासन यांच्यातील नात्यातही बदल घडतो. नागरिक हा केवळ शासकीय योजनांचा लाभार्थी नसून सार्वजनिक कारभाराविषयी प्रश्न विचारणारा घटक आहे, ही जाणीव अधिक दृढ होते. लोकशाहीत लोकप्रतिनिधी निवडून देणे ही नागरिकांची महत्त्वाची भूमिका असली, तरी त्यानंतरही सार्वजनिक जीवनातील नागरिकांचा सहभाग सुरू राहतो. विकासकामांची माहिती घेणे, सार्वजनिक सेवांबाबत प्रश्न उपस्थित करणे, उपलब्ध योजनांचा अभ्यास करणे आणि सार्वजनिक संस्थांकडून उत्तरदायित्वाची अपेक्षा करणे हा लोकशाही सहभागाचाच भाग आहे. माहितीचा अधिकार या सहभागाला कायदेशीर आधार देतो.या अधिकाराचा वापर करताना त्याची कायदेशीर चौकट समजून घेणे तितकेच आवश्यक आहे. प्रत्येक प्रकारची माहिती कोणत्याही परिस्थितीत सार्वजनिक करता येते, असे नाही. राष्ट्रीय सुरक्षा, काही संवेदनशील प्रशासकीय बाबी, वैयक्तिक गोपनीयता आणि कायद्यात नमूद केलेल्या इतर बाबींना काही परिस्थितीत अपवाद लागू होतात. त्यामुळे माहितीचा अधिकार हा अमर्यादित स्वरूपाचा अधिकार नसून कायद्याने निश्चित केलेल्या चौकटीत वापरला जाणारा अधिकार आहे. पारदर्शकता आणि गोपनीयता, सार्वजनिक हित आणि वैयक्तिक हक्क यांच्यात संतुलन राखणे ही आधुनिक लोकशाहीसमोरील महत्त्वाची गरज आहे.डिजिटल क्रांतीमुळे माहितीपर्यंत पोहोचण्याची साधने मोठ्या प्रमाणात बदलली आहेत. आज शासनाच्या संकेतस्थळांवर विविध योजना, अधिसूचना, अहवाल, अंदाजपत्रके आणि सार्वजनिक माहिती उपलब्ध होत आहे. ऑनलाइन सेवा आणि डिजिटल नोंदींमुळे नागरिकांचा वेळ वाचतो आणि कार्यालयीन प्रक्रियेवरील अवलंबित्व काही प्रमाणात कमी होते. परंतु डिजिटल माध्यमे उपलब्ध आहेत म्हणून माहितीचा समान प्रवेश सुनिश्चित झाला, असे म्हणता येत नाही. इंटरनेटची उपलब्धता, डिजिटल साक्षरता, भाषेची अडचण, तांत्रिक कौशल्याचा अभाव आणि डिजिटल साधनांची मर्यादित उपलब्धता यामुळे समाजातील काही घटक अजूनही माहितीच्या मुख्य प्रवाहापासून दूर राहू शकतात.म्हणूनच माहितीचा सार्वत्रिक प्रवेश म्हणजे केवळ माहिती इंटरनेटवर ठेवणे नव्हे. माहिती अचूक, अद्ययावत, समजण्यास सोपी, शोधण्यास सुलभ आणि विविध सामाजिक घटकांसाठी उपलब्ध असणे आवश्यक आहे. विशेषतः दिव्यांग व्यक्तींसाठी सुलभ डिजिटल संकेतस्थळे, ग्रामीण नागरिकांसाठी स्थानिक भाषेतील माहिती आणि डिजिटल साधनांपासून दूर असलेल्या नागरिकांसाठी पर्यायी व्यवस्था निर्माण करणे गरजेचे आहे. माहितीच्या लोकशाहीकरणाचा खरा अर्थ समाजातील प्रत्येक घटकाला माहितीच्या प्रवाहात सहभागी करून घेण्यात आहे.आज माहितीच्या उपलब्धतेबरोबरच माहितीच्या विश्वासार्हतेचा प्रश्नही महत्त्वाचा झाला आहे. सामाजिक माध्यमांमुळे माहितीचा प्रसार अभूतपूर्व वेगाने होत असला, तरी त्यातील प्रत्येक माहिती अचूक असेलच असे नाही. चुकीची माहिती, अपूर्ण माहिती, संदर्भहीन माहिती किंवा दिशाभूल करणारे संदेश समाजात वेगाने पसरू शकतात. त्यामुळे माहिती मिळविणे जितके आवश्यक आहे, तितकेच तिची सत्यता तपासणेही आवश्यक आहे. अधिकृत सरकारी संकेतस्थळे, कायदेशीर दस्तऐवज, मान्यताप्राप्त संस्थांचे अहवाल आणि विश्वसनीय माध्यमे यांचा संदर्भ घेण्याची सवय नागरिकांमध्ये विकसित होणे गरजेचे आहे. माहितीच्या अधिकाराबरोबरच माध्यम साक्षरता आणि डिजिटल साक्षरता हीदेखील आधुनिक नागरिकत्वाची आवश्यक कौशल्ये बनली आहेत.प्रशासनाच्या पातळीवरही मोठ्या बदलांची आवश्यकता आहे. नागरिकांनी प्रत्येक मूलभूत माहितीसाठी स्वतंत्र अर्ज करावा लागणे ही पारदर्शक प्रशासनाची आदर्श स्थिती नाही. सार्वजनिक संस्थांनी कायद्यातील तरतुदींनुसार आवश्यक माहिती स्वयंस्फूर्तीने आणि नियमितपणे उपलब्ध करून देण्याची संस्कृती विकसित केली पाहिजे. विकासकामे, सार्वजनिक निधीचा वापर, विविध योजना, निविदा, सेवा वितरण, कार्यालयीन जबाबदाऱ्या आणि नागरिकांसाठी आवश्यक असलेली मूलभूत माहिती सहज उपलब्ध झाली, तर प्रशासनाविषयीचा विश्वास वाढण्यास मदत होऊ शकते. माहिती लपविण्यापेक्षा माहिती सहज उपलब्ध करून देणे ही आधुनिक लोकशाही प्रशासनाची दिशा असली पाहिजे.स्थानिक स्वराज्य संस्थांच्या पातळीवर माहितीचा अधिकार अधिक प्रभावी ठरू शकतो. ग्रामपंचायत, नगरपालिका आणि महानगरपालिका या नागरिकांच्या दैनंदिन जीवनाशी थेट संबंधित संस्था आहेत. पाणीपुरवठा, स्वच्छता, रस्ते, सार्वजनिक प्रकाशयोजना, आरोग्य सुविधा, स्थानिक कर आणि विविध विकासकामांबाबत नागरिकांना माहिती उपलब्ध झाली, तर स्थानिक लोकशाही अधिक सक्रिय होऊ शकते. ग्रामसभा किंवा स्थानिक सार्वजनिक चर्चांमध्ये अधिकृत माहितीचा वापर केल्यास विकासाच्या प्राधान्यक्रमांवर अधिक माहितीपूर्ण चर्चा होण्यास मदत होऊ शकते. त्यामुळे माहितीचा अधिकार हा केवळ व्यक्तीचा कायदेशीर अधिकार नसून स्थानिक लोकशाही मजबूत करण्याचे साधनही आहे.महिलांच्या सक्षमीकरणासाठीही माहितीची भूमिका महत्त्वाची आहे. शिक्षण, आरोग्य, सामाजिक सुरक्षा, रोजगार, स्वयंरोजगार, स्थानिक स्वराज्य संस्था आणि महिला-केंद्रित योजनांबाबत योग्य माहिती उपलब्ध झाल्यास महिलांना उपलब्ध संधी आणि हक्कांची जाणीव होऊ शकते. त्याचप्रमाणे आदिवासी आणि दुर्गम भागातील समुदायांना त्यांच्या भाषेत आणि त्यांच्या सामाजिक परिस्थितीला अनुरूप माहिती उपलब्ध करून देणे आवश्यक आहे. माहितीची भाषा आणि स्वरूप हेही सामाजिक समावेशनाचे महत्त्वाचे घटक आहेत.माहितीचा अधिकार जबाबदारीने वापरणे हे नागरिकांचेही कर्तव्य आहे. माहिती मागण्याचा अधिकार हा लोकशाहीतील महत्त्वाचा अधिकार असला, तरी त्याचा वापर सार्वजनिक हित, पारदर्शकता आणि कायदेशीर हक्कांच्या चौकटीत होणे आवश्यक आहे. स्पष्ट आणि विशिष्ट माहिती मागितल्यास प्रशासनालाही अपेक्षित माहिती शोधून देणे अधिक सुलभ होते. मिळालेल्या माहितीचा संदर्भ समजून घेणे, तिची सत्यता तपासणे आणि आवश्यक असल्यास कायदेशीर प्रक्रियेचा अवलंब करणे ही नागरिकांची जबाबदारी आहे. अधिकार आणि जबाबदारी यांचा समतोल राखल्यास माहितीचा अधिकार अधिक प्रभावी लोकशाही साधन ठरतो.माहितीच्या अधिकाराची खरी ताकद केवळ किती अर्ज दाखल झाले किंवा किती माहिती मिळाली यामध्ये नाही; तर माहितीमुळे नागरिकांच्या सार्वजनिक सहभागात किती वाढ झाली, प्रशासन अधिक पारदर्शक झाले का आणि सार्वजनिक संस्थांची उत्तरदायित्वाची संस्कृती किती मजबूत झाली, यामध्ये आहे. माहितीच्या आधारे नागरिकांनी प्रश्न विचारले, प्रशासनाने स्पष्ट उत्तरे दिली आणि सार्वजनिक संस्थांनी आपल्या कामकाजात अधिक पारदर्शकता आणली, तर माहितीचा अधिकार लोकशाहीच्या दैनंदिन व्यवहाराचा प्रभावी भाग बनतो.२८ सप्टेंबरचा आंतरराष्ट्रीय माहिती अधिकार दिन आपल्याला याच मूलभूत सत्याची आठवण करून देतो की, माहितीपासून वंचित नागरिकाचा लोकशाही सहभाग मर्यादित होऊ शकतो. माहिती उपलब्ध झाली, समजली आणि तिचा योग्य वापर करण्याची क्षमता निर्माण झाली, तर नागरिक अधिक सक्षम होतो. त्यामुळे माहितीचा अधिकार हा केवळ सरकारी कागदपत्रे मिळविण्याचा मार्ग नाही; तो नागरिकांच्या आत्मविश्वासाचा, सार्वजनिक सहभागाचा आणि लोकशाही उत्तरदायित्वाचा आधार आहे.आजच्या काळात शासन, तंत्रज्ञान आणि नागरिक यांच्यातील संबंध वेगाने बदलत आहेत. कृत्रिम बुद्धिमत्ता, डिजिटल प्रशासन, सामाजिक माध्यमे आणि मोठ्या प्रमाणातील माहिती यामुळे नव्या संधी निर्माण झाल्या आहेत, तसेच गोपनीयता, माहितीची सत्यता आणि डिजिटल विषमता यांसारखी आव्हानेही पुढे आली आहेत. या बदलत्या परिस्थितीत माहितीच्या अधिकाराची मूलभूत भावना अधिक महत्त्वाची ठरते कि सार्वजनिक जीवनाशी संबंधित आवश्यक माहिती नागरिकांपासून अनावश्यकपणे दूर राहू नये.लोकशाहीची खरी शक्ती जागरूक नागरिकांमध्ये असते. जागरूकतेचा पाया माहितीमध्ये आहे आणि माहितीचा अधिकार त्या पायाला कायदेशीर बळ देतो. शासनाने पारदर्शकतेची संस्कृती विकसित करणे, प्रशासनाने नागरिकांना वेळेत आणि सुलभ माहिती उपलब्ध करून देणे आणि नागरिकांनी मिळालेल्या माहितीचा जबाबदारीने वापर करणे, या तिन्ही बाबी एकत्र आल्या तर लोकशाही अधिक सहभागी आणि उत्तरदायी होऊ शकते. म्हणूनच २८ सप्टेंबर हा दिवस केवळ माहितीच्या अधिकाराची आठवण करून देणारा दिवस नसून 'माहिती ही नागरिकशक्ती आहे' हा लोकशाहीचा मूलभूत संदेश अधोरेखित करणारा दिवस आहे. माहितीची दारे खुली असतील, प्रश्न विचारण्याची मुभा असेल आणि उत्तरदायित्वाची संस्कृती बळकट असेल, तरच लोकशाहीचा प्रवास अधिक व्यापक, समावेशक आणि अर्थपूर्ण होईल.



**डॉ. राजेंद्र बगाटे, (लेखक, समाजशास्त्राचे अभ्यासक आहेत)**
**bagate.rajendra5@gmail.com**

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), सोमवार २८ सप्टेंबर २०२६


# पाणीटंचाई, दुष्काळ आणि सामाजिक संकट : गांभीर्याने विचार करण्याची वेळ




जून महिन्याच्या प्रारंभीच हवामानातील बदल, मान्सूनची अनिश्चितता आणि एल निनोच्या संभाव्य परिणामांविषयी हवामान तज्ज्ञांनी इशारा दिला होता. पावसाचे आगमन उशिरा होणे, पावसामध्ये मोठे खंड पडणे किंवा अपेक्षित प्रमाणात पाऊस न पडणे याचा थेट परिणाम शेती, पिण्याचे पाणी, पशुधन, ग्रामीण अर्थव्यवस्था आणि एकूणच सामाजिक जीवनावर होतो. हवामान खात्याने व्यक्त केलेली चिंता प्रत्यक्ष परिस्थितीतही जाणवू लागल्याने शेतकरी, ग्रामीण जनता आणि प्रशासनासमोर मोठे आव्हान उभे राहिले आहे. पावसाने दडी मारल्यास सर्वप्रथम त्याचा फटका शेतकऱ्यांना बसतो. भारतीय शेतीचा मोठा भाग आजही पावसावर अवलंबून आहे. पेरणीच्या काळात पुरेसा पाऊस झाला नाही, तर शेतकऱ्यांच्या संपूर्ण हंगामाचे गणित बिघडते. पेरणी केलेल्या पिकांना वेळेवर पाऊस मिळाला नाही तर बियाणे, खते, मजुरी आणि मशागतीवर झालेला खर्च वाया जाण्याची शक्यता निर्माण होते. त्यामुळे शेतकऱ्यांच्या मनात असुरक्षिततेची भावना निर्माण होते. आकाशाकडे डोळे लावून बसलेल्या शेतकऱ्यांसाठी प्रत्येक पावसाची सर ही केवळ नैसर्गिक घटना नसते, तर ती त्यांच्या कुटुंबाच्या भविष्याशी जोडलेली आशा असते. विशेषतः दुष्काळग्रस्त जिल्ह्यांमध्ये परिस्थिती आणखी गंभीर बनते. ज्या भागात भूजलपातळी आधीच खालावलेली आहे, विहिरी कोरड्या पडल्या आहेत, तलाव आणि बंधाऱ्यांमध्ये पुरेसा पाणीसाठा नाही, अशा ठिकाणी पावसाचा खंड अधिक त्रासदायक ठरतो. पाण्याअभावी केवळ शेतीच अडचणीत येत नाही, तर जनावरांसाठी चारा आणि पाण्याची समस्या निर्माण होते. ग्रामीण अर्थव्यवस्थेचा कणा असलेले पशुधन क्यात येते. परिणामी शेतकऱ्यांचे उत्पन्न कमी होते आणि कुटुंबाच्या उदरनिर्वाहाचा प्रश्न गंभीर बनतो. शेतकरी हा केवळ स्वतःच्या कुटुंबाचा पोशिंदा नाही; तो संपूर्ण समाजाचा अन्नदाता आहे. आपल्या ताटातील अन्नामागे त्याचे कष्ट, त्याचा वेळ, त्याची गुंतवणूक आणि निसर्गाशी केलेला संघर्ष असतो. त्यामुळे दुष्काळ किंवा पाणीटंचाईचा प्रश्न हा केवळ शेतकऱ्यांचा प्रश्न म्हणून पाहता येणार नाही. तो संपूर्ण समाजाच्या अस्तित्वाशी संबंधित प्रश्न आहे. शेतकरी अडचणीत आला तर त्याचा परिणाम बाजारपेठेवर, अन्नधान्याच्या उपलब्धतेवर, ग्रामीण रोजगारावर आणि शेवटी शहरी समाजावरही होतो. या पार्श्वभूमीवर उपलब्ध पाण्याचा प्रत्येक थेंब जपून वापरणे अत्यंत आवश्यक आहे. पाण्याची उपलब्धता मर्यादित असताना त्याचा अमर्यादित वापर करणे ही गंभीर सामाजिक समस्या आहे. अनेक ठिकाणी पिण्याच्या पाण्याचा वापर अनावश्यक कामांसाठी केला जातो. नळ सुरू ठेवणे, गळतीकडे दुर्लक्ष करणे, वाहन धुण्यासाठी मोठ्या प्रमाणावर पाणी वापरणे, घरगुती आणि सार्वजनिक ठिकाणी पाण्याचा अपव्यय करणे अशा अनेक सवयींमुळे मौल्यवान पाण्याची नासाडी होते. पाण्याची समस्या केवळ ग्रामीण भागापुरती मर्यादित राहिलेली नाही. शहरी भागातही वाढती लोकसंख्या, वाढते शहरीकरण आणि भूजलाचा अतिवापर यामुळे पाण्याची मागणी सातत्याने वाढत आहे. एखाद्या शहराला दररोज मोठ्या प्रमाणावर पाण्याची आवश्यकता असते. मात्र पाण्याचे स्रोत मर्यादित असतात. पाऊस कमी पडला आणि जलसाठे भरले नाहीत, तर शहरांना पाणीपुरवठा करण्याचे मोठे आव्हान प्रशासनासमोर उभे राहते. अशा वेळी प्रश्न निर्माण होतो—पिण्याचे पाणी आणायचे कुठून? पाण्याचे संकट वाढले तर त्याचा परिणाम सामाजिक संबंधांवरही होऊ शकतो. पाण्यासाठी लांब अंतरावर जावे लागणे, पाण्याच्या टँकरवर अवलंबून राहावे लागणे, पाण्याच्या वाटपात असमानता निर्माण होणे किंवा काही भागांना अधिक तर काही भागांना कमी पाणी मिळणे यामुळे सामाजिक तणाव वाढू शकतो. पाण्याच्या उपलब्धतेतील असमानता ही आर्थिक आणि सामाजिक विषमता अधिक तीव्र करू शकते. गरीब आणि वंचित कुटुंबांना पाण्यासाठी अधिक वेळ, पैसा आणि श्रम खर्च करावे लागू शकतात. दुष्काळाचा परिणाम रोजगारावरही होतो. शेतीची कामे कमी झाली की ग्रामीण भागातील मजुरांना रोजगार मिळत नाही. परिणामी स्थलांतर वाढू शकते. अनेक कुटुंबांना रोजगाराच्या शोधात शहरांकडे जावे लागते. ग्रामीण भागातून होणारे स्थलांतर हे केवळ आर्थिक स्थलांतर नसते; त्यामागे कुटुंबांचे विभाजन, मुलांच्या शिक्षणातील अडथळे, आरोग्याच्या समस्या आणि सामाजिक असुरक्षितता अशा अनेक बाबी जोडलेल्या असतात. दीर्घकाळ दुष्काळ किंवा तीव्र पाणीटंचाई निर्माण झाली तर त्याचे व्यापक सामाजिक परिणाम होऊ शकतात. बेरोजगारी, गरिबी, स्थलांतर, कर्जबाजारीपणा आणि संसाधनांवरील संघर्ष यांसारख्या समस्या वाढू शकतात. काही परिस्थितींमध्ये चोरी, लुटमार, पाण्यावरून वाद आणि इतर प्रकारचे सामाजिक संघर्ष वाढण्याची शक्यता असते. त्यामुळे पाणीटंचाईकडे केवळ पर्यावरणीय किंवा कृषी समस्या म्हणून पाहणे पुरेसे नाही. ती सामाजिक स्थैर्याशी संबंधित समस्या आहे. पाणीटंचाईचा सर्वाधिक परिणाम महिलांवर आणि मुलींवर होतो, हेही लक्षात घेणे आवश्यक आहे. अनेक ग्रामीण भागांमध्ये घरासाठी पाणी आणण्याची जबाबदारी महिलांवर असते. पाण्याचे स्रोत दूर गेले की महिलांचा वेळ आणि श्रम वाढतात. या अतिरिक्त श्रमामुळे त्यांच्या शिक्षणावर, रोजगारावर आणि आरोग्यावर परिणाम होऊ शकतो. त्यामुळे पाणी व्यवस्थापनामध्ये महिलांच्या अनुभवांचा आणि सहभागाचा विचार करणे गरजेचे आहे. या परिस्थितीत शासनाची भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे. जलसंधारण, पावसाचे पाणी साठवण, नद्या-नाले आणि तलावांचे पुनरुज्जीवन, भूजल पुनर्भरण, जलस्रोतांचे संरक्षण आणि पाण्याच्या न्याय्य वाटपासाठी प्रभावी धोरणे आवश्यक आहेत. गावपातळीपासून शहरांपर्यंत पाण्याचे नियोजन वैज्ञानिक पद्धतीने करणे गरजेचे आहे. उपलब्ध पाणीसाठ्याचे वास्तव मूल्यांकन करून त्यानुसार वापराचे नियोजन झाले पाहिजे. त्याचबरोबर नागरिकांची जबाबदारीही तितकीच महत्त्वाची आहे. पाणी वाचवणे ही केवळ शासनाची जबाबदारी नाही. प्रत्येक नागरिकाने आपल्या दैनंदिन जीवनात पाण्याचा काटकसरीने वापर केला पाहिजे. घरातील नळ आणि पाइपलाइनची गळती तातडीने दुरुस्त करणे, पावसाचे पाणी साठवणे, शक्य तेथे पुनर्वापर करणे, अनावश्यक पाणी वापर टाळणे आणि इतरांमध्येही जलसंवर्धनाची जाणीव निर्माण करणे आवश्यक आहे. पाण्याचे महत्त्व आपल्याला पाणी उपलब्ध असताना अनेकदा जाणवत नाही. मात्र जेव्हा विहीर कोरडी पडते, नळाला पाणी येत नाही, टँकरसाठी रांगा लागतात आणि शेतीला पाणी मिळत नाही, तेव्हा एका थेंबाचे मूल्य समजते. म्हणून पाण्याची किंमत संकट आल्यानंतर समजण्यापेक्षा संकट येण्यापूर्वीच त्याचे महत्त्व ओळखणे आवश्यक आहे. आजची परिस्थिती आपल्याला स्पष्ट संदेश देत आहे—पाणी वाचवा, पाणी जपा आणि भविष्यासाठी पाण्याचे नियोजन करा. अन्नदात्याला वाचवायचे असेल तर शेती वाचवावी लागेल; शेती वाचवायची असेल तर पाणी वाचवावे लागेल. ग्रामीण आणि शहरी समाजाचे जीवन सुरक्षित ठेवायचे असेल तर जलस्रोतांचे संरक्षण करावे लागेल. दुष्काळ ही केवळ निसर्गाची परीक्षा नाही; ती आपल्या नियोजनाची, सामाजिक जबाबदारीची आणि संसाधनांच्या वापराबाबतच्या शहाणपणाचीही परीक्षा आहे. आज आपण पाण्याचा प्रत्येक थेंब जपला, तर उद्याच्या पिढ्यांना सुरक्षित भविष्य देऊ शकतो. अन्यथा पाण्याची कमतरता ही भविष्यातील सर्वात गंभीर सामाजिक समस्यांपैकी एक ठरू शकते. त्यामुळे शासन, स्थानिक स्वराज्य संस्था, शेतकरी, उद्योग, नागरिक आणि सामाजिक संस्थांनी एकत्रितपणे जलसंवर्धनाची चळवळ उभी करणे ही काळाची गरज आहे. पाण्याचा प्रत्येक थेंब अमूल्य आहे. आज तो जपला, तर उद्याचे जीवन जपले जाईल.




**प्रा. डॉ. प्रियदर्शन भवरे,**
**समाजशास्त्र विभाग,**
**बद्रीनारायण बारवाले महाविद्यालय,**
**जालना ९४०५९१३२९७**



**प्रतिनिधी नेमणे आहे**

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहेत. तालुक्यातील राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक तसेच शैक्षणिक क्षेत्राची माहिती असणाऱ्यास प्राध्यान्य ! इच्छुकांनी आपला अल्पपरिचय (बायोडाटा) ७५८८००५००२ या नंबरवर Whatsup करावा.

दै. महाराष्ट्र जनशक्ती हे महाराष्ट्रातील मराठी भाषेत वाचले जाणारे प्रमुख ई-दैनिक आहे. आपल्या व्यवसायाची जाहिरात करून व्यवसायवृद्धी करा.

**Education of the Day**

YCMOU सेंटर कोड : 21187

YCMOU मुक्त विद्यापीठात प्रवेशासाठी सुवर्णसंधी

B.A.(मराठी व उर्दू माध्यम)

M.A.- मराठी, हिंदी, उर्दू, अर्थशास्त्र, इतिहास आणि लोकप्रशासन

9405109103, 8830838903